बुधवार, ३ जुलै २०२४

किंमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)

मराठी • दैनिक

वर्ष - ०३ • अंक - २९८

आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

• MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) WEDNESDAY 3 JULY 2024 adhunikkesari.com • YEAR-03 • ISSUE-298 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-12 • PRICE-05




आधुनिक केसरी न्यूज

दादासाहेब घोडके

पैठण : संत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी सोहळा शनिवारी आषाढी वारीसाठी पैठणहून पंढरपूरकडे मार्गस्थ झाला. या पालखीचा पहिला रिंगण सोहळा मंगळवारी दुपारी १२ वाजता चकला बोरगाव (जि. बीड) येथे उत्साहात पार पडला. हे नयनरम्य दृश्य डोळ्यात साठविताना हजारो वारकऱ्यांनी विठुनामाचा गजर केला. संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पायी दिंडी सोहळ्यात तीन रिंगण पार पडतात. त्यापैकी पालखीतील पहिले रिंगण मंगळवारी चकला बोरगाव या गावात पार पडले. वारकरी संप्रदायात शेकडो वर्षापासून पालखीला रिंगण सोहळ्याची परंपरा आहे. वारीत चालून थकलेल्या वारकर्यांना या माऊलीच्या अश्वाच्या रिंगण सोहळ्यामुळे उर्जा मिळते हे तितकेच खरे आहे.

# १ रुपयात ८५ पैशांचा घोटाळा होत होता

## पंतप्रधान नरेंद्र मोदी काँग्रेसवर हल्लाबोल



आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : एक कालखंड देशाने पाहिला आहे की, ज्यावेळी बेशरमपणे हे मान्य केले जायचे की, दिल्लीतून एखाद्या प्रकल्पासाठी १ रुपया निघाला तर योजनेपर्यंत त्यातले १५ पैसे पोहचत होते. १ रुपयात ८५ पैशांचा घोटाळा होत होता. घोटाळ्यांच्या खाईत देश बुडाला होता. शिफारस न करता काहीही मिळत नव्हते. गरीबाला घर घ्यायचे असेल तर लाच द्यावी लागत होती. गॅस कनेक्शनसाठी खासदारांच्या घरी जावे लागायचे. मोफत रेशनही लोकांना मिळत नव्हते, त्यासाठी लाच द्यावी लागत होती. देशाने २०१४ मध्ये आम्हाला निवडले आणि तो देशाच्या परिवर्तानाचा प्रारंभ होता. १० वर्षांत आम्ही देशाचा आत्मविश्वास परत आणला. आज देशाचा आत्मविश्वास दुणावला आहे, भारत काहीही करु शकतो हे देशातल्या सामान्य माणसाला वाटते, असे म्हणत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काँग्रेसच्या घोटाळ्यांची मालिकाच संसदेत मंगळवारी वाचून दाखवली.**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरूवातीला नियमांचे पालन करुन भाषण केले त्या सगळ्यांचे कौतुक केले. पंतप्रधान मोदी बोलायला उभे राहिल्यानंतर विरोधकांनी मणिपूर, मणिपूरच्या घोषणा दिल्या, तानाशाही बंद करोच्याही घोषणा दिल्या. मात्र मोदींनी त्यांचे भाषण थांबवले नाही. ते पुढे म्हणाले की, देशात एक उत्तम निवडणूक प्रक्रिया पार पडली. त्यामुळे जगासमोर हे उदाहरण ठेवले गेले की, हे जगातला सर्वात मोठा निवडणूक कार्यक्रम भारतात झाला. मी काही लोकांची वेदना समजू शकतो. कारण वारंवार खोटे बोलूनही त्यांचा पराभव झाला. आम्हाला भारताच्या जनतेने देशाची सेवा करण्याची संधी दिली आहे. ही बाब लोकशाही मानणाऱ्या आपल्या देशासाठी महत्त्वाची घटना आहे. हा लोकशाहीचा गौरव आहे, असेही मोदी म्हणाले.

प्रत्येक कसोटीला सामोरे गेल्यानंतर जनतेने आम्हाला निवडले आहे. आमचा दहा वर्षांचा ट्रॅक रेकॉर्ड जनतेने पाहिला आहे. जनतेने हे पाहिले आहे की गरीब कल्याणासाठी आम्ही समर्पण भावाने काम केले. जनसेवा हीच प्रभूसेवा मानून काम केले. आम्ही जे कार्य करुन दाखवले त्यामुळे २५ कोटी गरीब दारिद्र्य रेषेच्या बाहेर काढले आहे. आम्हाला त्यामुळेच गरीबांचा आशीर्वाद मिळाला आहे. २०१४ मध्ये आम्ही पहिल्यांदा जिंकून आलो तेव्हा निवडणूक प्रचारातही आम्ही सांगितले होते की, भ्रष्टाचाविरोधात आमचा झीरो टॉलरन्स असेल. आम्हाला आज गर्व आहे की देशाचा सामान्य माणूस भ्रष्टाचाराने पिचला होता. भ्रष्टाचाराविरोधात आमची जी नीती आहे ती पाहूनच आम्हाला तिसऱ्यांदा आशीर्वाद मिळाला. आज जगभरात भारताचे नाव मोठे झाले आहे, भारताचा गौरव झाला आहे. भारताकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलला आहे, असेही पंतप्रधान नरेंद्र मोदींनी म्हटले आहे.देशाच्या जननेते पाहिले आहे की राष्ट्र प्रथम ही आमची भावना आहे. आमची नीती, आमचे निर्णय, आमचे काम या सगळ्याचा तराजू एकच आहे, राष्ट्र प्रथम. देशात आवश्यक बदल करायचे होते त्यात आम्ही सातत्य ठेवले आहे. सबका साथ, सबका विकास हा मंत्र घेऊन आम्ही पुढे चाललो आहोत.

**आपल्या देशाने दीर्घ काळ लांगुलाचनाचे राजकारण पाहिले :** देशात पहिल्यांदा सेक्युलराझिमचा जो प्रयत्न आम्ही केला . आम्ही तुष्टीकरण नाही तर संतुष्टीकरण आणले . आम्ही लोकांना आमच्या कामांमधून समाधान दिले . त्यामुळेच आम्हाला देशाने तिसऱ्यांदा संधी दिली . जी लोकसभा निवडणूक झाली त्याच्या निकालाने हे दाखवून दिले की भारताची जनता विवेकपूर्ण आहे . उच्च आदर्शांचा उपयोग देशाची जनता सद्बुद्धीने करते, त्यामुळेच आम्हाला देशाची सेवा करण्याची संधी तिसऱ्यांदा मिळाली आहे . आमची नियत, आमची निती, आमची निष्ठा यावर जनतेने विश्वास दाखवला आहे, असेही पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले . विकसित भारत जेव्हा आपण म्हणतो तेव्हा खेडेगावांची स्थिती, शहरांची स्थिती यामध्ये सुधारणा होते . मोठ्या प्रमाणावर विकास केला जातो . जगाच्या विकासयात्रेत भारताची शहरे असावीत हे आमचे स्वप्न आहे .

# अंतरवाली सराटीत ड्रोनच्या घिरट्या

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** मराठा आरक्षण आंदोलनाचा सध्याचा राज्यातील प्रमुख चेहरा असलेले मनोज जरांगे पाटील यांच्यावर पाळत ठेवली जात आहे का, अशी शंका आता उपस्थित झाली आहे. मनोज जरांगे पाटील हे सध्या अंतरवाली सराटी गावातील सरपंचांच्या घरी तळ ठोकून बसले आहेत. मात्र, सोमवारी मध्यरात्री मनोज जरांगे यांचा मुक्काम असलेल्या घरावर एक ड्रोन घिरट्या घालत असल्याचे दिसून आले. या प्रकरामुळे अंतरवाली सराटीच्या ग्रामस्थांमध्ये एकच खळबळ उडाली आहे. सोमवारी मध्यरात्री एक ड्रोण मनोज जरांगे यांचा मुक्काम असलेल्या घराभोवती फिरत होता. त्यावेळी मनोज जरांगे पाटील यांनी स्वतः गच्चीवर जाऊन पाहणी केली. यानंतर त्यांनी सहकाऱ्यांशी चर्चाही केली. या प्रकाराबद्दल अंतरवाली सराटीचे सरपंच आणि ग्रामस्थांनी पोलिसांना तोंडी तक्रार दिली आहे.

आता पोलीस घटनास्थळी येऊन पाहणी करण्याची शक्यता आहे. चार दिवसांपूर्वीच अंतरवाली सराटीत अशाचप्रकारे ड्रोन घिरट्या घालताना दिसून आला होता. मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजाला सगेसोयऱ्यांच्या व्याख्येत बसणारे आणि ओबीसी प्रवर्गातून आरक्षण देण्यासाठी 8 जूनपासून आंतरवाली सराटी येथे पुन्हा आमरण उपोषण सुरु केले होते. मात्र, चार दिवसांमध्येच राज्य सरकारचे शिष्टमंडळ जरांगेंच्या भेटीसाठी आले होते. त्यावेळी सरकारी शिष्टमंडळाने सगेसोयऱ्यांच्या आरक्षणाच्या अंमलबजावणीसाठी मुदत वाढवून देण्याची मागणी केली होती. त्यानंतर मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकारला 13 जुलैपर्यंतची मुदत देत आमरण उपोषण स्थगित केले होते. ही मुदत संपायला आता अवघे 12 दिवस शिल्लक राहिले आहेत.

**मनोज जरांगे यांना संरक्षण द्यावे :** अंतरवली सराटी गावाची ड्रोनच्या माध्यमातून टेहळणीच्या मुद्द्यावर विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनातही चर्चा झाली . विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी विधानसभेत हा मुद्दा मांडला . ड्रोनच्या माध्यमातून टेहळणीमुळे जरांगे पाटलांच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो . या सगळ्यामागे कोण आहे ? अंतरवाली सराटी हे गाव मराठा आरक्षण आंदोलनासाठी ओळखले जाते . त्यामुळे याप्रकरणात आवश्यक असल्यास संपूर्ण चौकशी झाली पाहिजे . गरज भासल्यास मनोज जरांगे यांना संरक्षण द्यावे .

**चौकशी करु :** राज्याचे गृह राज्यमंत्री शंभुराज देसाई यांनी मनोज जरांगे पाटील यांच्या घराबाहेर फिरणाऱ्या ड्रोनबाबत चौकशी करण्याचे आदेश देण्यात आल्याचे सांगितले . या संदर्भात चौकशी करुन सविस्तर अहवाल दिला जाईल . जरांगे पाटील यांना याआधी हत्यारी संरक्षण दिले आहे . पोलीस अधिकाऱ्यांसबोत बोलून अधिक संरक्षण देण्याची गरज असल्यास ते दिले जाईल .


# उत्तर प्रदेशातील हाथरसमध्ये सत्संगात चेंगराचेंगरी

## ५० जणांचा मृत्यू; तीन चिमुकल्यांसह महिलांचाही समावेश

आधुनिक केसरी न्यूज

**हाथरस :** उत्तर प्रदेशातील हाथरस येथे एका धार्मिक कार्यक्रमात चेंगराचेंगरीत आतापर्यंत ५० जणांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती आहे. यामध्ये मोठ्या प्रमाणात महिलांचा समावेश आहे. तसेच दोन पुरुषांसह तीन चिमुकल्यांचादेखील यात मृत्यू झाल्याचे सांगण्यात आले आहे. हाथरस येथील रतिभापूर गावात ही घटना घडली. या गावात मंगळवारी साकार विश्व हरी भोले बाबा यांचा संत्सग आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला जवळपास १५०० नागरीक उपस्थित होते. या कार्यक्रमाला स्थानिक प्रशासनाने परवानगीदेखील दिली होती. दरम्यान, सत्संग सुरू चेंगराचेंगरीची घटना घडली. यात जवळपास ५० जणांचा मृत्यू झाला. यासंदर्भात बोलताना, आम्ही आतापर्यंत १०० पेक्षा जास्त जणांना सरकारी रुग्णालयात दाखल केले आहे. या रुग्णालयाची रुग्णांना दाखल करण्याची क्षमता संपली आहे. त्यामुळे आम्ही खासगी रुग्णालयांना रुग्णांना दाखल करून घेण्यास सांगितलं आहे, अशी माहिती हाथरसचे पोलीस अधिक्षक राजेश कुमार सिंह यांनी दिली. तसेच ही घटना नेमकी कशी घडली? यासंदर्भात तपास सुरू आहे, असेही ते म्हणाले. दरम्यान, या घटनेनंतर उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनीही प्रतिक्रिया दिली आहे. या घटनेत ज्यांचा मृत्यू झाला, त्यांच्या कुटुंबियांप्रती मी संवेदना व्यक्त करतो. या ठिकाणी बचाव व मदतकार्य युद्धपातळीवर सुरू आहे. जखमींना उपचारकरिता रुग्णालयात दाखल करण्यात येत आहे, असं योगी आदित्यनाथ म्हणाले. पुढे बोलताना, उत्तर प्रदेश सरकारमधील मंत्री लक्ष्मी नारायण चौधरी आणि संदीप सिंह हे दोघेही घटनास्थळी जाण्यासाठी रवाना झाले आहेत, अशी माहितीही त्यांनी दिली. याशिवाय ही घटना नेमकी कशी घडली, याची चौकशी करण्यासाठी एका विशेष समितीची स्थापना करणयात आल्याचेही त्यांनी सांगितले.





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी



## एकाच ह्या जन्मी जणू...

डॉ. नाडकर्णी यांनी अनेक क्षेत्रात ज्यांनी अनोखं कार्य केलं आहे, अशा लोकांच्या मुलाखती घेतल्या आहेत आणि त्यांना आपल्यासमोर आणण्याचं काम केलं आहे. ते मुलाखतीत डॉ शारदाताईंना विचारत होते की शिक्षण म्हणजे स्वतःच्या अज्ञानाची टप्प्याटप्प्याने विकसित होणारी जाणीव असं आपल्याला का वाटतं ? ही खरं तर शिक्षणाची आगळीवेगळी आणि सुंदर व्याख्या. डॉ शारदा बापट यांनीच केलेली. उत्तरादाखल त्या म्हणाल्या, ' आपण जेवढे जेवढे अधिक शिकत जातो, तेवढे तेवढे आपल्याला किती कमी ज्ञान आहे हे कळत जाते. म्हणजेच आपल्या अज्ञानाची जाणीव होते. हे अफाट असलेलं विश्व, त्यात एक छोटासा ग्रह म्हणजे आपली पृथ्वी. त्या पृथीवरचा एक जीव म्हणजे मानव. तरी आपल्याला केवढा अभिमान असतो स्वतःचा...! लांब कशाला जायचे ? वैद्यकीय शास्त्राचा अभ्यास करताना मला आपल्या शरीरातल्याच अफाट विश्वाचं दर्शन झालं. हे शरीर लाखो पेशींनी बनलेलं एक अद्भुत आश्चर्य आहे. या सगळ्या पेशी एकमेकांच्या सहकार्याने काम करतात. एखादी को-ऑपरेटिव्ह सोसायटीचं जणू..! आपल्या चुकीच्या जीवनशैलीमुळे आपण अनेक आजारांना निमंत्रण देतो.



## हितगुज



पुष्प
१०५वे

### गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे, दिंडोरी (नाशिक)

## भगवंताची स्मृती तिथेच समाधानाची प्राप्ती!

एखाद्या दगडावर पुष्कळ पाणी एकदम ओतले तर तो दगड नुसता भिजेल आणि पाणी निघून जाऊन कोरडा होईल पण तेच थेंब थेंब असे एकाच ठिकाणी आणि अखंड पडत राहीले तर त्या दगडाला भेग पडेल आणि काही दिवसांनी दगड फुटूनही जाईल, त्याप्रमाणे केव्हातरी पुष्कळ सेवासाधना करण्यापेक्षा अल्प प्रमाणात का होईना नियमितपणे जर नामस्मरण केले तर ते जास्त परिणामकारक होते. देह प्रारब्धावर सोडावा आणि मन श्री स्वामी महाराजांच्या स्मरणात ठेवावे हे कोणालाही जमू शकते परंतु गरिबाला गरिबीचे दुःख म्हणून, श्रीमंताला पैशाचा अभिमान आणि लोभ असतो म्हणून तर अशिक्षीताला काय करावे हे समजत नाही म्हणून श्री स्वामींच्या स्मरणात मन स्थिर करणे जमत नाही. नीतीधर्माचे आचरण, शास्त्रशुध्द वर्तन, शुध्द अंतःकरण आणि श्री स्वामी समर्थ महाराजांचे अखंड नामस्मरण इतक्या गोष्टी असतील तर सेवेकरी शेवटपर्यंत पोहोचेल आणि शेवटपर्यंत पोहोचला तरच फायदा.

प्रपंच करीत असतांना वाईट विचार मनात येतात, त्याचप्रमाणे परमार्थ करीत असतांनाही वाईट विचार मनात आले म्हणून घाबरुन जाण्याचे कारण नाही. ज्यावेळी मनात वाईट विचार येतील त्यावेळी श्री स्वामी महाराजांचे स्मरण केले तर त्या विचारांची मजल पुढे जाणार नाही. दृढ विश्वासाने नामस्मरण करावे. जिथे कर्तव्याची जागृती आणि भगवंताची स्मृती आहे तिथेच समाधानाची प्राप्ती होते.

## गोरक्षनाथ

आधुनिक केसरी

माझंच बघा, माझा एक मुलगा बारा वर्षांचा आहे, त्याची अजून मुंज व्हायची आहे. दुसरा मुलगा अठरा वर्षांचा आहे, त्याचे शिक्षण



अर्धवट झालेले आहे. सर्वांत मोठी मुलगी आहे तिला वीस वर्षे पूर्ण झाली, तरी तिचे लग्न जमत नाही. मुलांच्या काळजीने बायको खंगत चालली आहे. तिला औषधपाणी करावे लागते. या सर्वांसाठी माझी मिळकत अपुरी पडते. अशा परिस्थितीत काळजी करू नको तर काय करू? नाथांनी त्या गृहस्थाचे म्हणणे शांतपणे ऐकून घेतले. नंतर ते हसून त्याला म्हणाले, "काळजी करून प्रपंचातील प्रश्न सुटतात का ? आजपर्यंत आपण काळजी करत आलात, त्याने तुंमच्या समस्या दुर झाल्या का? तरी कोणतीही गोष्ट केवळ काळजीने सुटली नाही. हे कळूनसुद्धा आपल्याला असे वाटत नाही की, आतापर्यंत केली तेवढी काळजी पुरे. काळजी करण्यापेक्षा मनाचे समाधान जर टिकवले आणि चित्त भगवंताच्या नामावर केंद्रित केले, तर मार्ग सापडण्याची शक्यता जास्त असते. भगवंत सर्वशक्तीमान असल्यामुळे त्याला सर्व गोष्टी शक्य आहेत. तो आपल्या भक्ताच्या मार्गातिल काटे अलगत दुर ककतो. यासाठी जास्तीतजास्त वेळ भगवंताचे नाम स्मरण चिंतन करावे आपला वेळ त्यात जास्तित जास्त घालवावा." हे सर्व ऐकल्यावर त्या गृहस्थाला आपली चूक समजली. तो नाथांना नमन करुन त्यांना शरन गेला नाथांनि आपली कृपादृष्टी त्याच्यावर टाकली व त्याला त्याच्या विवंचनेतुन बाहेर काढले. पुढे त्या गावात काही काळ व्यतीत करुन भगवंत भक्तिची गोडी लोकांत जाग्रुत करुन नाथांनी पुढे गमन केले. तात्पर्य :- मनाचे समाधान जर टिकवायचे असेल, तर नामावर मन केंद्रित केले पाहिजे. काळजी केल्याने कुठलेही प्रश्न सुटत नाहीत. यासाठी जास्तीतजास्त वेळ नामस्मरणात घालवावा. **गोरक्षनाथांची वाङ्मयसंपदा :** आज गोरक्षनाथांनी निर्माण केलेल्या २८ संस्कृत व ४० हिंदी ग्रंथांचा शोध लागला असून ते वाचल्यानंतर गोरक्षांच्या तत्त्वज्ञानाचा सहज परिचय होतो. या ग्रंथात सिद्धसिद्धांतपद्धती, गोरखबानी, महार्थमंजरी, अवधूतगीता, योगमार्तंड, अमरौघप्रबोध, गोरक्षशतक इ. ग्रंथ प्रमुख मानले जातात. यापैकी 'सिद्धसिद्धान्तपद्धती' हा गोरक्षांचा सर्वांत महत्वाचा असा संस्कृत ग्रंथ समजला जातो. यात नाथांनी लोकल्याणासाठी योगमार्गातील गुह्य ज्ञान प्रकटकरून सांगितले असून बद्ध जीवांना मोक्ष मिळवून देणारा असा हा अत्यंत श्रेष्ठग्रंथ आहे. तर 'गोरखबानी' मध्ये योग्याने सदासर्वदा आत्म्याचेच चिंतन करायला हवे व त्यासाठी पंच ज्ञानेंद्रियांना अंतर्मुख करणे आवश्यक आहे असे त्यांनी सांगितले आहे. अशाच साधकाला अलख निरंजन परब्रह्माचा साक्षात्कार होऊन तो जीवन्मुक्त होईल असे ते सांगतात. त्यांच्या 'अमनस्कयोग' या ग्रंथात जीवन्मुक्तीचे रहस्य विशद करून सांगितले असून हा योग मंत्रयोग, ध्यानयोग, जपयोग यांच्यापेक्षाही श्रेष्ठ असल्याचे म्हटले आहे. हा योग जाणणारा योगी सुख-दुःख,शीत-उष्ण, स्पर्श, रस, रूप गंध यांच्या पलीकडे गेलेला असतो.



आधुनिक केसरी


### मन किर्तनात | दंग झाले ||

किर्तनासी जावे | आनंदे डोलावे ||
अमृत सेवावे | सर्वकाळ ||१||
अनुभवे येता | अमृताची गोडी ||
विठ्ठल आवडी | अंतर्बाह्य ||२||
जगण्याचे सार | सांगे संतवाणी ||
हाती चिंतामणी | येतो जाण ||३||
आचार विचार | कर्म तिर्थावळ ||
विकार विटाळ | दूर झाला ||४||
नित्य गंगा जळ | वाहते रक्तात ||
मन किर्तनात | दंग झाले ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

औधै कुम्भ न जल भरे,
भरत ऊर्ध्व मुख होय ।
गगन उड़े नहीं एक पग, त्याग भूमि उड़ सोय ।।४५।।(स्वर्वेद द्वितीय मण्डल दशम अध्याय) ०२/१०/४५


मूळ भाष्याचा मराठी अनुवाद : पाण्यात पालथी घागर कधीच भरत नाही. घागरीचे तोंड वर केल्या नंतरच ती पाण्याने भरते. पक्षी एका पायाने आकाशात उडू शकत नाही. जेव्हा तो दोन्ही पायांनी पृथ्वीचा आधार सोडेल तेंव्हाच तो आकाशात उडू शकेल. आत्म्याची शक्ती जोपर्यंत प्रकृतीमुख बाहेर जगात राहील, तोपर्यंत परब्रह्म सत्तेचा आनंद प्राप्त करू शकणार नाही. चेतना ऊर्ध्व झाल्या नंतरच आत्म्यात ब्रह्म रसाचा प्रवाह प्रवाहित होईल. विखुरलेली आत्मशक्ती ऊर्ध्व होऊ शकत नाही. म्हणून योग साधने द्वारे आत्मा जेव्हा आपली सर्व चेतन शक्ती सर्व देह संघातापासून अलग एकवटून शुद्ध चेतन आकाशात घेऊन जातो, तेव्हा तो निज लक्ष्य शब्दानंद म्हणजेच परमानंद प्राप्त करून जन्म-मृत्यूच्या दुःखातून सुटतो.

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## गुरुसेवा करणे म्हणजे काय ?

आधुनिक केसरी

साधनाची आटाआटी कुठपर्यंत करायची ? जप, तप, नेम, याग वगैरे आपण कशाकरिता करतो ? तर देवाची प्राप्ती व्हावी म्हणून; तोच देव जर आपल्या घरी आला, तर साधनाची आटाआटी कशाला करायची ? म्हणून, साधनाची आटाआटी करण्याचे कारण नाही; नाहीतर त्याचाच अभिमान होतो, आणि मिळवायचे ते बाजूलाच राहून उलट तोटा होतो. जे जे घडत असते ते माझ्या इच्छेने झाले असे समजत जा आणि त्यात आनंद माना. तुम्ही जी जी गोष्ट कराल त्यात मला आठवा. गुरुभक्ती करायची म्हणजे काय ? त्याच्या देहाची सेवा करणे हीच गुरूची सेवा असे तुम्हाला वाटते का ? त्याच्या देहाची सेवा करणे ही गुरूची खरी सेवाच होत नसते; गुरू सांगेल तसे वागणे, हीच त्याची खरी सेवा होय. माझ्याजवळ जे येतात, ते कुणी मुलगा मागतो, कुणी संपत्ती मागतो, कुणी रोग बरा करा म्हणून मागतो; तेव्हा, माझी सेवा करायला तुम्ही येता, का मीच तुमची सेवा करावी म्हणून येता ? माझ्याजवळ येऊन,



मनुष्यदेहाचे खरे सार्थक होईल असे करा. तुम्ही मागाल त्याप्रमाणे मी थोडेसे देणार नाही असे नाही; पण ते काढा घेण्याकरिता गुळाचा खडा देण्यासारखे आहे. ' मला सर्व कळते ' असे माझ्याबद्दल तुम्ही म्हणता, पण ते मनापासून नव्हेच; कारण ज्याला असे खरोखर वाटत असेल त्याच्या हातून पापकर्म होणारच नाही. ज्याची वृत्ती माझ्याशी एकरूप होईल त्यालाच कळेल की, मला सर्व कळते आहे. गुरूला अनन्य शरण जाणे म्हणजे इतके की, त्याचे मन आणि आपले मन एक झाले पाहिजे; म्हणजे, दैववशात् जरी आपण गुरूपासून दूर असलो तरी मनाने त्याच्याशी संलग्न असल्यावर त्याच्यापाशीच असू. आपण आपल्या आईशी जसे बोलतो तसे माझ्यापाशी बोलावे, आपले सर्व दुःख मला सांगत जावे. तुम्ही इतके कष्ट घेऊन मला भेटायला येता, पण तुम्हांला रिकामे परत जाताना पाहून मला फार वाईट वाटते. माझ्याजवळ जे आहे ते व्यावहारिक जगात कुठेही तुम्हांला मिळायचे नाही; ते म्हणजे भगवंताच्या नामाचे प्रेम होय. सगळ्या प्रपंचात खरी विश्रांती असेल तर ती नामस्मरणातच आहे. ज्याला मी भेटावा असे वाटते, जो माझा म्हणवितो, त्याला नामाचे प्रेम असलेच पाहिजे.

**१८४. नामावर प्रेम करणे म्हणजेच माझ्यावर प्रेम करणे.**

## देहान्तनिरूपण

आधुनिक केसरी

मित्रांनो आपण समासाच्या शेवटच्या भागात कडे आलो आहोत. तर



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

संपूर्ण समासाचं सारं आता थोडक्यात मांडण्याचा प्रयत्न करते. काही चुकलं तर समर्थ क्षमा करतील अशी आशा करून समर्थांचा आशीर्वाद मागते. समासाची थोडक्यात माहिती विश्वाच्या व्यवहारात जिकडे तिकडे शक्तिचा खेळ चाललेला आहे.शक्ति ही अनादी अनंत आहे. श्री समर्थ शक्ति या शब्दाचा अर्थ या समासात वायु या अर्थाने वापरतात. वायु चे दोन रूपे आहेत एक स्थिर रूप व दुसरे गतिमान रूप.स्थिर रूपातील शक्ति सगळ्या विश्वाला अनंतकाळ टिकवून ठेवते. तर दुसऱ्या रूपात ती विश्वाला निर्माण करून त्यामध्ये अनंत घडामोडी घडवून आणते. पण शक्ति ही आंधळी नाही ती डोळसपणे सगळीकडे बारकाईने पहाते. ती जाणिव संपन्न आहे. म्हणजेच मुळमायाच जाणिव रूप आहे स्वस्वरूप हे जाणिवेचे खरे मूळ ठिकाण असून तीचा वावर तिथे सहज असतो. स्वरूपीं लीन होणारी जाणिव स्तब्ध असते. तर विश्वामध्ये ती गतिमान होते व आपले कर्तृत्व गाजवते.तिचे कार्य कुठे दिसते तर कुठे दिसत नाही.पण तिचे कार्य मात्र सतत चालूच असते. कधी खूप पाऊस पडतो नद्या नाले तुडूंब भरून वाहू लागतात. कुठे ओला दुष्काळ तर कुठे कोरडा दुष्काळ पडला आहे. म्हणजेच जाणीव ही कधी प्रगट होते तर कधी गुप्त होते.



# भावे आणि कंपनीचा नूतनीकरणाचा उद्‌घाटन समारंभ उत्साहात संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** भावे आणि कंपनी ने 66 वर्षाची परंपरा जपत त्यांच्या ऑगस्ट होम उल्कानगरीतील शाखेच्या नूतनीकरण समारंभ दैनिक आधुनिक केसरीचे संपादक डॉ.प्रभू गोरे यांच्या हस्ते एक जुलै रोजी उत्साहात संपन्न झाला. याप्रसंगी भावे आणि कंपनीच्या आधार स्तंभ श्रीमती विभावरी भावे, विश्वजीत भावे, वैशाली भावे, जयदीप भावे, यश भावे, शामसुंदर हेजीब, ज्येष्ठ कलावंत सुधीर कोर्टीकर, रेनाटेस वेलनेसचे संचालक राजेश गुप्ता , श्रीनिवास सौवतसरे, राजेश पटेल, दिपक गुरुभय्ये तसेच भावे आणि कंपनीचा कर्मचारी वर्ग व ग्राहकवर्गाची उपस्थिती होती. भावे आणि कंपनीने मोनोभावे शुद्ध खावे या आपल्या घोषवाक्यांची 66 वर्षाची परंपरा जपलेली आहे. मिल्क प्रोडक्ट, होम प्रोडक्ट , बेकरी प्रोडक्ट, उपवासाचे प्रोडक्ट, कोकण प्रोडक्ट , इंस्टंट प्रोडक्ट व हेल्थ प्रोडक्ट असे अनेक गुणवत्तापूर्ण दर्जेदार उत्पादने मिळतात याचं भावनेनं भावेआणि कंपनीकडं ग्राहक सदैव येतात हिचं आमच्या कामाची फलश्रृती आहे, असे विश्वजीत भावे यांनी बोलताना सांगितले.


# गुरूजी तुमच्याकडून अपेक्षा नव्हती..!

## नारवट शाळेतील शिक्षकांचा प्रताप : शिक्षण विभागाचे अभय

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** भोकर-नांदेड रस्त्यावर असलेल्या नारवट (ता. भोकर) येथील ग्रामस्थांनी गावात विधायक कामांना प्राधान्य दिल्याने तालुक्यात गावची वेगळी ओळख निर्माण झाली आहे. अशा गावातील शाळेची गुणवत्ता हि वाख्याण्याजोगी आहे. येथील दोन शिक्षकांनी मागील तीन वर्षांपासून सावळा गोंधळ घातल्याने शाळेची पत गेली आहे. याबाबत शिक्षण विभागाकडे तक्रारी करूनही उलट शिक्षकांशी पाठीशी घालत असल्याने ग्रामस्थात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. वरिष्ठांनी त्वरित लक्ष देवून शिक्षकांची बदली करावी, अशी मागणी सरपंचांनी केली आहे.

येथील ग्रामपंचायत व शालेय शिक्षण समितिने मूख्य कार्यकारी अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की,आई हे बालकांचा पहिला त्यानंतर शिक्षक हा दूसरा "गुरू" आहे. अशा पवित्र क्षेत्रात बालमनावर सूससंस्कार घडविण्याचे ज्ञान मंदिर म्हणून शाळेला संबोधल्या जात.याच मंदिरातील शिक्षकांचे वर्तन जर गैर असेल तर भावी पिढि बरबाद होईल यात शंका नाही.येथील विद्यार्थी पटसंख्या (३५)असुन शिक्षकांची तीन पदे भरण्यात आली आहेत.मागील तीन वर्षांपासून येथील सहशिक्षक श्री.बसीनलोड व श्री.रेणेवाड कार्यरत आहेत. शाळेत मद्द प्राशन करून विद्यार्थ्यांना ज्ञानाचे धडे देतात नव्हे तर शासकीय कर्तव्य बजावताना अनेकदा गोंधळ घातल्याचे आढळून आले आहे. ग्रामस्थांना उद्धटपणे बोलतात. शिक्षकाच्या अशा वर्तनास विद्यार्थी आणि पालकात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.याबाबत तक्रार केली असता दोघांना भोकर येथील गटशिक्षण कार्यालयात ठेवण्यात आले होते.त्यामूळे एकाच शिक्षकावर येथील कारभार सोपविण्यात आला होता.यंदा पून्हा शिक्षण विभागाने त्या वादग्रस्त शिक्षकांना शाळेवर पाठवल्याने ग्रामस्थात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.पवित्र अशा ज्ञान मंदिरात शिक्षकांचा दिवसाढवळ्या गैरवर्तन सूरू असुन शिक्षणविभाग मात्र मुगगीळून गप्प असून त्या शिक्षकास अभय देत असल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.संबधीत वरिष्ठांनी शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रात सूरू असलेल्या गैरप्रकारास त्वरित आळा बसवावा अशी मागणी येथील सरपंच रामदास जोंधळे, ऊपसरपंच नागोराव झाडे,शालेय शिक्षण समीतिचे अध्यक्ष संजय झाडे यांनी केली आहे.



नारवट येथील शाळेतील दोन शिक्षकांनी मागील तीन वर्षांपासून गैरवर्तन केल्याने दोघांना माझ्या कार्यालयात ठेवण्यात आले होते . शासकीय नियमानुसार त्यांना जास्तकाळ ठेवता येत नाही .शाळेवर जाऊ नका असा तोंडी आदेश दिल्या नंतरही ऐकत नाहीत .मागील पंधरा दिवसांपासून त्यांचे वेतन बंद करण्यात आले आहे . एका पदांची मान्यता रद्द करण्यात आल्याने तीथेच दोनच शिक्षकांची नियुक्ती करावी लागते .वरिष्ठांशी चर्चा करून लवकरच दूसर-या शिक्षकांची नियुक्ती करण्यात येणार आहे .

**एम .वाघमारे, गटशिक्षण अधिकारी,भोकर**

# चंद्रपूर, मूल, तडाली रेल्वे स्टेशनवर सुविधा द्यावी

## सुधीर मुनगंटीवार यांचे केंद्रीय रेल्वेमंत्री वैष्णव यांना पत्र

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** चंद्रपूर हा महाराष्ट्राच्या शेवटच्या टोकावर असलेला जिल्हा आहे. देशाच्या चारही दिशांनी जाणाऱ्या सर्व रेल्वे गाड्यांसाठी चंद्रपूर हे एक महत्त्वाचे ठिकाण आहे. त्यातच शेतकऱ्यांची संख्या जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात असून विविध प्रकारच्या कृषी निविष्ठा, बी-बियाणे, खते तसेच रेल्वेद्वारे मोठ्या प्रमाणात जीवनावश्यक वस्तुंची वाहतूक होते. सध्या खरीप हंगामाला सुरवात झाली आहे. त्यामुळे जिल्ह्यात खते आणि बियाणांची आवक वाढली असून जिल्ह्यातील चंद्रपूर, मूल आणि तडाली रेल्वे स्टेशनवर कृषी निविष्ठांसाठी स्वतंत्र प्लॅटफॉर्म, शेड आणि गोदामाची व्यवस्था असणे गरजेचे आहे. ही बाब लक्षात घेऊन राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांना पत्राद्वारे विनंती केली आहे. सद्यस्थितीत जिल्ह्यातील चंद्रपूर, मूल आणि तडाली रेल्वे स्टेशनवर कृषी निविष्ठाचे आवागमन आणि खतांचा साठा चांगल्या प्रकारे जतन करून ठेवण्यासाठी आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध नाही. येथे स्वतंत्र प्लॅटफॉर्म, शेड आणि गोडावून नसल्याने खते आणि बियाणांची नासाडी तसेच कृषी विषयक साहित्य सुस्थितीत ठेवण्यास अनेक अडचणी निर्माण होत आहे. याचा परिणाम जिल्ह्यातील शेतकरी तसेच कृषी क्षेत्रावर होत आहे. रेल्वेने आलेले कृषी विषयक साहित्य, खते, बियाणे आदी बाबी रेल्वे स्टेशनवर उतरविल्यानंतर त्याचा पुरवठा जिल्ह्यात इतरत्र केला जातो. त्यासाठी चंद्रपूर, मूल आणि तडाली येथील रेल्वे स्टेशनवर स्वतंत्र प्लॅटफॉर्म, पावसापासून कृषी निविष्ठांचा बचाव करण्यासाठी उत्तम शेड आणि साठवणुकीसाठी गोडावूनची आवश्यकता आहे. या सोयीसुविधा येथे उपलब्ध करून दिल्या तर खते आणि बियाणे वाहतुकीदरम्यान वाया जाणार नाही तसेच त्यांची नासाडीसुध्दा वाचेल. सोबतच जिल्ह्यासाठी एक उत्कृष्ट पुरवठा साखळी निर्माण होऊन त्याचा फायदा लाभार्थी आणि कृषी क्षेत्राला होण्यास मदत मिळेल.

शेतकऱ्यांच्या दृष्टीने अतिशय महत्वाच्या असलेल्या या विषयासंदर्भात चंद्रपूर, मूल आणि तडाली येथील रेल्वे स्टेशनवर सदर सुविधा उपलब्ध करून देऊन शेतक-यांना दिलासा द्यावा, अशी मागणी पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांना पत्राद्वारे केली आहे.




# ओवैसींचा दावा

आधुनिक केसरी

असदुद्दीन ओवैसी यांनी खासदारांचा शपथविधी होत असताना जय पॅलेस्टाईनचा नारा दिला. त्यामुळे त्यांच्याविरोधात लोकसभेत गदारोळ झालेला पाहण्यास मिळाला होता. आता पुन्हा एकदा असदुद्दीन ओवैसींनी भाजपावर निशणा साधला आहे, तसेच संसदेत संविधानाचे पान दाखवत भाजपाने तिरस्कार पसरवल्याचा आरोप केला आहे. ज्या संविधानावर टिपू सुलतानचा फोटो होता त्यावर सरदार वल्लभभाई पटेल आणि श्यामाप्रसाद मुखर्जींची सही होती, असा दावा असदुद्दीन ओवैसींनी केला आहे. अध्यक्ष महोदय, अभिभाषणावर मला संधी दिल्याबद्दल मी तुमचा आभारी आहे. मी आज त्या लोकांच्या वतीने बोलतो आहे जे दिसतात, त्यांची चर्चा होते पण त्यांचे ऐकून कुणीही घेत नाही. मी त्यांच्या वतीने बोलतो आहे ज्यांना पंतप्रधान घुसखोर म्हणतात. मी त्या आया बहिणींच्या वतीने बोलतो आहे ज्यांच्याबाबत मोदी म्हणतात की यांना जास्त मुले होतात. मी मॉब लिंचिंगद्वारे ज्यांना मारले जाते त्यांची बाजू मांडायला उभा आहे. मी त्या मूक आई वडिलांच्या वतीने बोलतो आहे ज्यांची मुले या सरकारमुळे तुरुंगात आहेत, असं ओवैसी म्हणाले. संविधान तयार होत असताना तेव्हा आरक्षणाचा विषय आला. त्यावेळी हिंदू आणि मुस्लिम दोन्ही समुदायांनी हा निर्णय घेतला की यावर आपण एक होणार नाही. आपल्या वरिष्ठांनी काय म्हटले? बहुसंख्यांनी अल्पसंख्याकाचे रक्षण करणे हे कर्तव्य आहे हे घटना लिहिणाऱ्यांनी ठरवले. भाजपा मुस्लिम लोकांच्या तिरस्कारावर निवडून येते. जे मुस्लिमांची बाजू घेतता ते देखील तसं फक्त दाखवतात. फक्त चार टक्के मुस्लिम निवडून येतात. संविधान हे काही पुस्तक नाही ज्याचे चुंबन घेतले जावे, जे दाखवले जावे. संविधान एक प्रतीक आहे. संविधान हे आपल्या वरिष्ठांनी, आपल्या देशाच्या संस्थापकांनी लिहिलेले आहे. त्यामुळे देश चालवण्यासाठी सर्वधर्मांची सहमती आवश्यक असल्याचे आपल्या देशाच्या संस्थापकांनी म्हटले. पण चार टक्के लोक निवडून येतात. जे मोहब्बतचे दावे करतात त्यांनी पंडीत नेहरु, सरदार पटेल यांनी अल्पसंख्याकांबाबत काय म्हटले होते ते वाचावे असा टोला ओवैसींनी राहुल गांधींनाही लगावला. भाजपाला आमचे अस्तित्वच नकोय आणि जे आमची बाजू घेतात त्यांच्यासाठी आमचे महत्त्व फक्त मत देण्यापुरतं आहे. ओबीसी समाजाचे खासदार हे आत्ता उच्चवर्गीय खासदारांच्या दर्जाचे झाले आहेत. मात्र मुस्लिम समुदायाकडे दुर्लक्ष होते आहे. CSDS चा डेटा हे सांगतो की मुस्लिमांची व्होट बँक या देशात नाही. ४ जूननंतर आत्तापर्यंत सहा मुस्लिमांचे मॉब लिंचिंग झालं. ११ घरे बुलडोझरने पाडण्यात आली. हिमाचलमध्ये एका मुस्लिम माणसाचं दुकान उडवलं. आता कदाचित वेळ आली आहे मुस्लिम नाव उच्चारण्यावरही बंदी घातली जाईल. माझे भाषण ऐकून ज्या मंत्र्यांना पोटदुखी झाली ते पाहून मला बरे वाटले असे म्हणत त्यांनी मनसुख मांडवीय यांनाही टोला लगावला.



प्रा.बरसमवाड विठ्ठल
गोकुळवाडी. ता. मुखेड

# भेटीलागीं जीवा लागलीसे आस।

आधुनिक केसरी

**पंढरीची वारी केली की स्वर्ग सुखाची प्राप्ती होते. अशी वारकऱ्यांची श्रद्धा आहे. म्हणून राज्यातून ठिकठिकाणा हुन पालख्या, दिंड्या पंढरपूरच्या दिशेने प्रस्थान करीत आहेत. प्रत्येक ठिकाणी पालख्यांचे स्वागत गावोगावी जेष्ठ, तरुण, चिमुकले वारकरी करीत आहेत. त्यामुळे सर्व वैष्णवांचा मेळा भक्तीच्या वातावरणात सध्या तल्लीन झाला आहे. ग्यानबा तुकारामचा गजर करून भक्ती रसात न्हाऊन निघालेले वारकरी, खांद्यावर भगवी पताका घेऊन तसेच महिलांनी डोक्यावर तूळशीचे वृंदावन ठेवून देहभान विसरून पांडुरंगाचे गुण गात माऊलीच्या सहवासाची आणि विठुरायाच्या चरणाची सेवा मिळावी असे प्रत्येक भाविकास वाटते.**



ज्या सुखा कारणे देव वेडावला । वैकुंठ सोडुनी संत सदनी राहिला।। त्यासाठीच असे म्हटले जाते .सर्व प्रपंच विसरून पायी दिंडी वारकरी करतात अनेक ठिकाणी मुस्लिम बांधव ही पायी दिंडीला भोजनाची सोय करतात म्हणून ही दिंडी सलोख्याची, ऐक्याची,समानतेची आहे.

होय होय वारकरी। पाहे पाहे रे पंढरी कसले निमंत्रण न देता आलेला हा जनसागर सखा पांडुरंगाची सुख वाटे जीवा म्हणत एकेक पाऊल पुढे टाकत फुगड्या, झिम्मा खेळत खेळत चंद्रभागेच्या वाळवंटात कधी पोहोचले त्यांचे त्यांना कळत नाही. म्हणून आनंदाने वारी करा.

पंढरीची वारी विशेषः मराठी महिन्यानुसार चौथा महिना म्हणजे आषाढ होय. या आषाढीत पंढरीची वारी निघते. महाराष्ट्राच्या नव्हे तर जगाच्या कानाकोपऱ्यातून आपल्या प्रियतम पांडुरंगाला भेटण्यासाठी वारकरी आसुसलेला असतो. म्हणून ही पंढरीची वारी कधी येते आणि मी कधी जाऊ अशी अवस्था भक्ताची होते. म्हणूनच हा अभंग निरूपणासाठी घेतलेला आहे. महाराष्ट्रात नेमक्या याच काळात पेरणी येते व शाळांची लगबग सुरू होते या सर्व धावपळीच्या गर्दीतून वारकरी बरोबर पंढरीच्या दिशेने चिखल तुडवत, पावसात भिजत मुखाने माऊलीचा जयघोष करीत, पावलोपावली पांडुरंगाचे दर्शन घेण्यासाठी पंढरीच्या दिशेने मार्गक्रमण करतो, पाहे रात्रंदिवस वाट तुझी हे परमेश्वरा मी तुझी रात्रंदिवस वाट पाहत आहे.कधी एक बार तुझ्या नामाचा जयघोष करून मला रात्रं दिवस तळमळ लागली आहे.चंद्र उगवण्याची वाट ज्याप्रमाणे चकोर पाहत असतो, त्याप्रमाणे मी तुझी वाट पाहत आहे. केव्हा एकदाचे तुला भेटू असे मला झाले आहे. आई-वडिलांच्या घरी राहिलेली मुलगी विवाह नंतर सासरी जाते. दीपावलीच्या सणाला केव्हा मला नेण्यासाठी माझा बंधुराज येईल म्हणून ती सारखी वाटेकडे पाहत असते. तिचे तन-मन आता कशात ही लागत नाही तिला फक्त आस असते. आपल्या गावाकडे माहेराकडे येण्याची,त्याचप्रमाणे पंढरीच्या पांडुरंगाची मला आस लागली आहे. असे हे भक्तगण म्हणतात. एखादी छोटे बालकाला भूक लागली की ते आईच्या शोधात निघते. त्याला आईची आठवण येते, म्हणून सारखे सारखे त्याच्या आईचीच वाट पाहते, त्याला दुसरे काहीही नको असते, आईच्या नावाचा तो धावा करत असतो, म्हणून संत तुकाराम महाराज म्हणतात. भुकेलेल्या बाळ जसे आईची धावा करते, तसे मी पांडुरंगाची धावा करीत आहे. म्हणून मला सुद्धा अशाच प्रकारे परमेश्वरांना पाहण्यासाठी त्यांच्या दर्शनासाठी त्याची भूक लागली आहे. केव्हा त्याला डोळा भरून पाहावे असे मला झाले आहे. त्यासाठी ते म्हणतात. तुका म्हणे मज लागलीसे भूक। धावूनि श्रीमुख दावीं देवा ।।

अशा पद्धतीने या पृथ्वीतलावर असणाऱ्या हा नयनरम्य सोहळा पाहण्यासाठी तुकाराम महाराज परमेश्वराच्या दर्शनासाठी 'भेटी लागी जीवा लागलीसे आस'असे म्हणतात. म्हणून मी वारकऱ्यांना सांगू इच्छितो की तुम्ही जसे परमेश्वराला भेटण्या साठी जातात तसेच सर्वजण एकत्रित राहतात,भेदभाव करत नाहीत. उच्च- नीच समजत नाहीत. आपण सगळे एक आहोत हे वारीचं वैशिष्ट्य आहे. वारीही आपल्याला राष्ट्रीय एकात्मता शिकवते ,स्वतःची कामे स्वतः करायला लावते, वारीमध्ये अहंपणा नसतो, वारी मधला माणूस श्रीमंत आहे की गरीब याचे कोणाला काही घेणे देणे नाही. फक्त तो माऊली या नावाने ओळखला जातो. समाजाचे आपण काहीतरी देणे आहे म्हणून अनेक गावांमध्ये आलेल्या पायी दिंडीला लोक भोजन वाढतात. पुण्य पदरात पाडून घेतात, आणि हा वारकरी तसाच पुढील गावात चालत राहतो म्हणून या रे या रे लहान थोर असे म्हटले जाते हा सर्व वैष्णवांचा मेळा चंद्रभागेला वाळवंटात थांबतो. तिथे सर्व देहभान विसरून विठ्ठलाचे नामस्मरण करतात. हा विठ्ठल युगानुयुगे कटेवर हात ठेवून उभा राहिलेला आहे .तो सर्वांचे दुःख जाणतो .म्हणून त्याला पाहण्यासाठी हजारो दिंड्या वेगवेगळ्या गावातून त्यांना भेटण्यासाठी जातात आणि भेटून मनोमन आनंदी होतात. पंढरीचा महात्मे वेगवेगळ्या पुराणात सांगितलेले आहे. पंढरी नगरी ही जीवाची आवडी असणारी आहे. हे जागृत दैवत आहे. त्यामुळेच जगद्गुरु तुकाराम महाराज ही आषाढी- कार्तिकी एकादशीला पंढरपुरात दाखल होतात, आणि परमेश्वरांना पाहण्यासाठी त्यांचा जीव कासावीस होतो. म्हणूनच भेटी लागी जीवा लागलीसे आस।असे ते म्हणतात.



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

# भावनात्मक दुर्बलता जीवन हितकारक नसते

आधुनिक केसरी

**आपण शिक्षण घेतो सज्ञानी व्हावं म्हणून आणि सज्ञानी होणं म्हणजे भावनात्मक दुर्बलता संपुष्टात येण पण आयुष्भर जर आपण भावनात्मक दुर्बल असु तर मग आपल्या शिक्षणाचा उपयोग काय. शिक्षित होऊन सज्ञान होणं आणि भावनात्मक दुर्बलता संपुष्टात येऊन विवेक वृत्ती धारण करणं जीवन हितार्थ असत.भावनात्मक दुर्बलता हि जीवन हितकारक कधीच नसते म्हणून दैनंदिन जीवनात भावनेला दुय्यम स्थान असलं पाहिजे.भावना आणि जीवन हे अविभाज्य आहे.पण भावनिकदृष्ट्या आपण कसे यानुसार आपलं जीवन ठरत असतं. भावनात्मक दृष्टीने जीवन सक्षम आणि मजबूत असलं पाहिजे.जीवन म्हटलं कि भावनांच्या लाटा निर्माण होणं स्वाभाविक आहे पण आपलं भवितव्य भावनांच्या लाटांवर आरूढ नसलं पाहिजे.**

जीवनाच्या पटलावर अनेक ठिकाणी म्हणजे वेगवेगळ्या विषयाशी बाबींशी भावनिकतेचा संबंध कळत न कळत येतच असतो.आणि मग अशा वेळी तो प्रभाव अभाव आपल्यवर किती प्रमाणात होऊ देयचा हे सर्वस्वी आपल्यवर अंवलबुन असतं.आपण जेवढे भावनिक तेवढाच त्या त्या विषयांशी आपला संबंध आहे.महणुन सध्या समाजिक,राजकिय भावनिकतेची दुकान सगळीकडे जोरदार सुरू आहे.पण या सगळ्यात आपली भावनिक कृती हि आपल्या नियंत्रणात असली पाहिजे.जेणेकरून इतर त्याचा गैरफायदा घेणार नाहीत. माणुष्य कोणीही असला तरी तो तसं भावना प्रदान असतोच.आणि भावनांच्या ओंडक्यावर तरंगत तरंगत या भवसागर रूपी संसाराला समोरे जाण्याचं काम जवळपास प्रत्येक व्यक्ती ला करावच लागत. आपल्या भावना इतरांना समजतीलच असं नाही.माझ्या भावना कोणीही समजुन घेत नाही असंच काहीसं प्रत्येकाच मत असतं अंतिम निष्कर्ष असतो.परंतु भावना विवश जगात जीवन जगत असताना मात्र मणुष्य इतरांच्या मतानुसार आपलं सुख दुःख ठरवत असतो.इतरांनी आपल्यला विषयी आपल्या समोर किंवा आपल्या पर्यंत पोहचल अशा पद्धतीने जर काही चांगलं उत्साह वर्धक म्हटलं सकारात्मक चर्चा केली किंवा खोटी खोटी स्तुती केली तर आपण नक्कीच आनंदी होतो.आणि जर इतरांच्या प्रतिक्रिया मत आपल्या विषयी समोर किंवा आपल्या परोक्ष चुकीचे , निंदानालस्ती आत्मक आलं,किंवा हेतुपुरसकृत आपल्यावर टिका टिप्पणी करण्यात आली तर आपण लगेच दुःखी होतो.म्हणजे एकंदरीत आपल सुख व दुःख हे लोकांच्या मतानुसार ठरत असेल तर मग आपण सक्षम व्यक्तिमत्व आहेत का ? आणि आपल्या सुख दुःख वर इतरांच्या मतांचा प्रभाव असावा हे सुयोग्य लक्षण नाही.आपल्या भावनांचा रिमोट कंट्रोल हा आपल्या हातात असला पाहिजे.म्हणजे लोकांच्या मतानुसार आपल सुख दुःख ठरणार नाही आणि त्याचा परिणाम हि आपल्या वर होणार नाही.एकंदरीत आपल जीवन आपण आपल्या ज्ञान , विवेक बुद्धी नुसार जंगल पाहिजे त्यामध्ये असणारा भवनिकतेचा संबंध हा आपल्या ज्ञान उंची वर अवलंबून असतो.आपण आपल्या ज्ञानाने सक्षम असु तर आपल्या भवनिकतेचा लगाम इतर कोणीही काबीज करू शकत नाही किंवा त्यावर ताबा मिळवु शकत नाही आणि एकदा का इतर कोणी आपल्या भावनिकतेचा लगाम ताब्यात घेतला तर मग मात्र आपल्याला आपला लगाम ज्यांच्या ताब्यात आहे त्याच्या मतानुसार जीवन जगावे लागेल आणि आपल्या जीवनातील क्षणोक्षणी होणारे निर्णय हे लगामधारी चया मतांवर अवलंबून असतील लगामधारी सुयोग्य असेल तर फार काही अडचण येणार नाही परंतु आपला भावनिक दृष्ट्या असणारा लगामधारी जर महा विचित्र असेल तर मग मात्र आपलं काही खरं नाही म्हणून भावनिकदृष्ट्या आपण किती मजबुत असलं पाहिजे किती स्वालंबी व किती परावलंबी असला पाहिजे याला खूप महत्त्व आहे आणि म्हणूनच आपण आपल्या भावनिकतेचा लगाम हा इतरांच्या ताब्यात न देता सद्सद्विवेक बुद्धी आणि ज्ञाननुसार आपल्या संनियंत्रणात ठेवला पाहिजे आणि हि ठेवण्याची कला ज्यांना अवगत झाली त्यांना जीवनाचा सुयोग्य मार्ग सापडला असं समजा या मार्गावर आपण कुठल्याही धोक्या शिवाय योग्य प्रवास करू शकतो. महणजे आपण भावनात्मक दुर्बल नसु तर आपलं हित निश्चित आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - बाजीराव श्रीराम खांदवे, अहमदनगर कार्यालय - तिसरा मजला, खरेदी विक्री संघाची जुनी इमारत, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहमदनगर ४१४००१, फोन ९८२२१०७६५०. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * Executive Editor - Bajirao Shriram Khandave. Ahmednagar office - third floor, kharedi - vikri sangh old building, Market yard Station Road, Ahmednagar 414001. Phone 9822107650.(* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# पक्षाने संधी दिल्यास नायगाव विधानसभा लढणार

## भाजप नेते मारोतराव कवळे यांची माहिती

आधुनिक केसरी न्यूज

**साईनाथ हमदे गोळेगावकर**

**उमरी :** माझ्याकडे कुठलेही पद नसतात नायगाव मतदारसंघात उद्योग उभारुन बेरोजगार तरुण व शेतकऱ्यांच्या हाताला काम मिळवून देण्याचा आजपर्यंत यशस्वी प्रयत्न केला आहे. त्याचबरोबर मतदारसंघातील सिंचनाचे प्रश्नही भविष्यात सोडवायचे आहेत त्यामुळे मी भाजपकडे नायगाव मतदारसंघातून निवडणूक लढवण्यासाठी उमेदवारीची मागणी करणार असल्याची माहिती व्हीपीके उद्योग समुहाचे संस्थापक अध्यक्ष मारोतराव कवळे यांनी पत्रकारांशी संवाद साधताना दिली.



शेतकरी नेते मारोतराव कवळे यांनी शनिवारी उमरी येथे काही पत्रकारांशी संवाद साधत विधानसभा निवडणूक लढवण्याची त्यांच्या मनातील इच्छा व्यक्त केली. शेतकरी, शेतमजूर, सुशिक्षित बेरोजगार, व्यापारी यांच्या हिताच्या दृष्टिकोनातून मी भागात उद्योग ऊभारले त्यातून आर्थिक बाजू भक्कम झाल्याने शेतकरी, शेतमजूर, बेरोजगार युवक व व्यापारी हे सन्मानाने जीवन जगत आहेत. त्यातभर म्हणून शेतकरी शेती जोडउद्योग व्यवसाय माध्यमातून दुग्धव्यवसायात जिल्हात धवलक्रांती निर्माण झाली. ऊस पिकातून व दुग्धव्यवसायातून करडो रुपये शेतकऱ्यांच्या खिशात जात आहेत. मतदारसंघातील शेतकरी सुधारले तरच खरा विकास होय. असे ही मत देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी साहेब, केंद्रीय सहकार मंत्री अमितभाई शहा साहेब, मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार,भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचेही तसे धोरण आहे. त्यांच्या विचारांच्या धोरणानुसार मी पक्षांच्या विचारांचा पताका घेऊन नायगाव विधानसभा मतदार संघात अजून नवनवीन उद्योग उभारून अनेकांना रोजगार उपलब्ध करुन देणार आहे. देशात व राज्यात भारतीय जनता पक्षाचे सरकार असल्याने शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टिकोनातून त्यांच्या शेतीला बारमाही पाणी कसे मिळवून देता येईल ते ही काम विद्यमान खासदार अशोकराव चव्हाण साहेब व माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर साहेब यांच्या माध्यमातून देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोंदी साहेब, देशाचे केंद्रिय सहकारमंत्री अमितभाई शहा साहेब, मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे साहेब, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब, उपमुख्यमंत्री अजित पवार साहेब,भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे साहेब यांची भेट घेऊन मतदारसंघातील सिंचनाचे प्रलंबित प्रश्न सोडवेल. मतदार संघातील शेतकरी शेतमजूर, बेरोजगार तरूण युवक यांची आर्थिक बाजू भक्कम झाली तर यातून व्यापारपेठ वाढेल. शेतक-यांची आर्थिक बाजू भक्कम झाल्याने माझा शेतकरी दोन चाकी वरून चारचाकी वाहन खरेदी करेल, मुलांना चांगले शिक्षण मिळेल, मुलीचे विवाह करतील आणि सन्मानाने जीवन जगता येईल, जर खिशात पैसे नसेल तर वरील प्रश्न सोडवता येणार नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानानुसार मी पक्षाकडे उमेदवारीसाठी प्रयत्न करणार असून मला पक्षाने संधी दिल्यास बीजेपी पक्षातील तिन्ही तालुक्यातील जेष्ठ, कनिष्ठ, तरुण कार्यक्रत्याना सोबत घेऊन जनतेसमोर केलेले मी विकास कामे माडूंन मत माघणार असल्याचे असे व्ही.पी.के.उद्योग समुहाचे संस्थापक अध्यक्ष मारोतराव कवळे गुरूजी यांनी पत्रकांरानी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर दिले. यापुर्वी माझ्याकडे कुठले पद व सत्ता नसताना शेतकरी, शेतमजूर, बेरोजगार युवकांच्या आर्शिवादाने भागात उद्योग उभारले. आता मी भाजप पक्षात असल्याने उमरी, धर्माबाद नायगाव तालुक्यात सिंचनाचे प्रलंबित प्रश्न सोडविन जनतेनी मला विधानसभेच्या निवडणुकीत संधी दिल्यास निवडणूक लढविण्यास तयार आहे असे कवळे गुरूजी यांनी पत्रकारांशी संवाद साधतांना सांगितले.

# काँग्रेसच्या प्रदेश उपाध्यक्ष डॉ. प्रज्ञा सातव यांना विधान परिषदेची उमेदवारी जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**हिंगोली :** राज्यातील विधान परिषद जागा संदर्भात निवडणूक जाहीर झाली असताना काँग्रेसकडून डॉक्टर प्रज्ञाताई सातव यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. यासंदर्भात काँग्रेसचे महासचिव केसी. वेणूगोपाल यांनी पत्र जारी केले आहे. विद्यमान कार्यकाळात प्रज्ञाताई सातव यांचा विधान परिषदेचा कार्यकाळ संपला होता. राज्यात जाहीर झालेल्या विधानपरिषद निवडणुकीसंदर्भात कोणाला उमेदवारी मिळणार याबाबत याबद्दल चर्चा सुरू होती. त्यातच विद्यमान खासदार नागेश पाटील आष्टीकर यांनी प्रज्ञाताई सातव यांच्या विरोधात काँग्रेसचे महासचिव के. सी. वेणुगोपाल यांच्याकडे तक्रार करीत लोकसभा निवडणुकीमध्ये त्यांनी विरोधकांना सहकार्य केल्याचा आरोप केला होता. या आरोपामुळे मोठी राजकीय चर्चा सुरू झाली होती. यामध्ये सातव यांची विधान परिषदेची उमेदवारी रद्द होण्याची देखील चर्चा सुरू होती. परंतु सोमवारी महासचिव के.सी. वेणूगोपाल यांनी पत्र जारी करताना काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या मान्यतेनुसार विधान परिषदेसाठी प्रज्ञा सातव यांच्या नावास मान्यता देण्यात आल्याचे कळविले आहे. सातव यांना दुसऱ्यांदा विधान परिषदेची उमेदवारी मिळाल्यामुळे येणाऱ्या विधानसभेत त्या दावेदार नसणार हे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे कळमनुरी विधानसभेमध्ये पुन्हा वेगळ्या राजकारणाची चर्चा सुरू झाली आहे. शिवाय पक्षाने त्यांना पुन्हा संधी दिल्याने जिल्ह्यातील काँग्रेस अंतर्गत गटातटाचे राजकारण अधिक बळवण्याची शक्यता देखील निर्माण झाली आहे. पक्षीय बलाबल पाहता सातव यांचा विजय निश्चित आहे. त्यामुळे त्यांच्या समर्थकांमध्ये उसाचे वातावरण पहावयास मिळत आहे.



# केरळच्या सिंधू पणीकर (नवगिरे) यांना आंतरभारतीचा स्नेहसंवर्धन पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**आंबाजोगाई :** दर वर्षी 15 ऑगस्ट रोजी दिला जाणारा आंतरभारतीचा स्नेहसंवर्धन पुरस्कार यंदा केरळची कन्या सिंधू पुरुषोथमन पणीकर (नवगिरे) यांना दिला जाणार आहे. अन्य प्रांतातून येऊन आंबाजोगाईत वास्तव्य करणाऱ्या व आंबाजोगाईच्या गौरवात भर टाकणाऱ्या व्यक्तीला हा पुरस्कार दिला जातो. श्रीमती सिंधू ह्या केरळच्या कोट्यायम जिल्ह्यातल्या. बी एस्सी नरसिंग करून आंबाजोगाईत आल्या. सुरुवातीला मानवलोक मध्ये काम केले. नंतर एम आय टीत सेवा दिली. तेथेच मारुती नवगिरे यांचा परिचय झाला. त्यांनी आंतर प्रांतीय व मानवी विवाह केला. पुढे त्यांनी बी एड करून एम आय टीच्या सरस्वती विद्यालयात सहशिक्षिकेची नोकरी पत्करली. श्रीमती सिंधू यांनी इंग्रजीत एम ए केले आहे. त्यांची दोन्ही मुले पुण्यात शिक्षण घेत आहेत. केरळची कन्या आंबाजोगाईची सून आहे म्हणून तिचा सन्मान करणे आंबाजोगाईकरांचे कर्तव्य ठरते. याच भावनेने हा पुरस्कार दिला जात आहे. मानकरी 2014ला प्राचार्य बी आय खडकभावी यांचा सन्मान करून स्नेहसंवर्धन पुरस्कार सुरू करण्यात आला होता. त्यानंतर मनीष स्वीटचे शशिकांत रूपडा (गुजरात), प्राचार्य महावीर शेट्टी (कर्नाटक), मेवाडचे शंकरजी मेहता (राजस्थान), आनंदराव अंकम (तेलंगण), उडपी हॉटेलच्या सुशीलाताई शेट्टी (कर्नाटक), सिमेंटच्या वस्तूंचे निर्माते शेख शमीम (उत्तर प्रदेश), लाकडी काम करणारे राजू जागींड (राजस्थान), टायर रिमोल्ड करणारे अजिथकुमार कुरूप (केरळ), वाचमनचे काम करणारे नरपती कुंजेडा (नेपाळ) यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे. एकमेव शहर अन्य प्रांतातून येऊन स्थायिक झालेल्या व शहराच्या गौरवात भर घालणाऱ्या व्यक्तीचा सन्मान करण्याची परंपरा आंबाजोगाईने सुरू केली आहे. या मागे 'हम सब एक हैं' ही राष्ट्रीय एकात्मतेची भावना बळकट करण्याचा विचार आहे.



# पाणीटंचाई बुलढाणेकरांच्या मानगुटीला

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** जिल्ह्यात आजअखेर पडलेला सरासरी पाऊस २०० मिलिमीटरच्या घरात असून अनेक तालुक्यात पावसाने द्विशतक पार केले आहे. मात्र जिल्ह्यावरील जलसंकटाचे सावट कायमच असल्याचे भीषण व दुर्दैवी चित्र आहे. वार्षिक सरासरी पर्जन्यमानाच्या (७६१.६ मिलिमीटर) जिल्ह्यात आज १ जुलै अखेर १८७.३ मिलिमीटर इतका पाऊस झाला आहे. याची टक्केवारी २६ टक्के इतकी आहे. जळगाव जामोद (२६० मिमी), बुलढाणा (२२० मिमी), लोणार (२०७ मिमी) आणि सिंदखेडराजा (२०१ मिमी) या तालुक्यात पावसाने द्विशतक पार केले आहे. चिखली (१७६ मिमी), देऊळगाव राजा (१८९ मिमी), मेहकर (१६८ मिमी), खामगाव (१५६ मिमी), शेगाव (१५२ मिमी), मलकापूर (१७२ मिमी), नांदुरा (१७६), मोताळा (१८८), संग्रामपूर(१७० मिमी) या तालुक्यांतही समाधानकारक पाऊस झाला आहे. पाऊस चांगला झालेला असला तरी जिल्ह्यातील धरणात आज रोजी अल्प जलसाठा उपलब्ध आहे. मोठ्या धरणांपैकी (बृहत) खडकपूर्णा प्रकल्पात अजूनही शून्य टक्केच जलसाठा आहे. पेन टाकळी प्रकल्पात ११.९२ टक्के तर नळगंगा प्रकल्पात २६.६७ टक्के इतकाच जलसाठा आहे. मध्यम प्रकल्पांची अशीच बिकट स्थिती आहे. तोरणा (७.८६ टक्के), पलढग (३४.८९ टक्के), अशी धरणातील जलसाठ्याची टक्केवारी काहीशी आहे.



# युवा ग्रामीण पत्रकार संघाची बैठक संपन्न; विविध विषयांवर चर्चा

आधुनिक केसरी न्यूज

**पांढरकवडा :** शासकीय विश्रामगृह पांढरकवडा येथे युवा ग्रामीण पत्रकार संघाची नुकतीच बैठक पार पडली, यावेळी अधिवेशन संबधी विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. आणि शेतकऱ्यांच्या समस्येवर तोडगा कसा काढण्यात येईल या संबंधी चर्चा करण्यात आली.

संपूर्ण महाराष्ट्रातच नव्हे तर इतर राज्यातही देश पातळीवर समाजातील प्रत्येक घटकांच्या न्याय हक्कासाठी सदैव तत्पर असलेल्या युवा ग्रामीण पत्रकार संघ फार कमी वेळात हवेच्या वेगाने संपूर्ण देशात पसरला गेला आहे. युवा ग्रामीण पत्रकार संघटना स्थापन झाल्यापासून ग्रामीण भागातील व शहरातील निर्भीड पत्रकारांचा पाया उभा करणे हे एकच ध्येय मनात ठेवून श्री गणेश कचकलवार राष्ट्रीय अध्यक्ष यांनी युवा ग्रामीण पत्रकार संघाची स्थापना केली. पत्रकारांना वेळोवेळी मार्गदर्शन करून कुठल्याही क्षेत्रातील त्यांच्या अडीअडचणी व समस्या तसेच पत्रकारांवर होणारे अन्याय अत्याचार, बातमीचे वृत संकलन करत असताना अनेक अडचणींना पत्रकाराना सामोरे जावे लागते. पत्रकारांच्या समस्या सोडविणे व वेळ प्रसंगी त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे तसेच पत्रकारांच्या न्याय हक्कासाठी शासन दरबारी लढा देणे हीच जिद्द ठेवून यांनी पत्रकारावरील अन्याय अत्याचार कुठेतरी थांबावा यासाठी युवा ग्रामीण पत्रकार संघाचे संपूर्ण देशात संघटन केले आहे. यावेळी युवा ग्रामीण पत्रकार संघाचे विदर्भ विभागीय उपाध्यक्ष श्री विनोद भाऊ कनाके, जिल्हा सरचिटणीस रवीभाऊ वल्लमवार, तालुकाध्यक्ष प्रफुल नांन्ने, तालुका सचिव गणेश सामजवार, परवेज खान, तन्वीर शेख, निलेश सिडाम, चेतन समाजावर आदी मान्यवर उपस्थित होते.

# गोरगरिबांसाठी लढणारी संघर्षयोद्धा

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** उषःकाळ फाउंडेशनच्या संचालिका उषा घाटे आहेत.एक वर्षांपासून गोरगरीब मुलांना शिकवणी, शालेय साहित्य वाटप,क्रीडा साहित्य वाटप, गरजूना जेवण पाण्याची व्यवस्था, फुथपाथवरील लोकांना कपडे वाटप करून गरिबांना मदतीचा हात देतात. जणू काय गोरगरीबासाठी लढणाऱ्या संघर्षयोद्धाच आहेत. धकाधकीच्या काळात कोणाकडे वेळ नाही, मात्र उषा घाटे नोकरी करत पोलीस आयुक्त छत्रपती संभाजीनगर येथे सहाय्यक पोलीस उपनिरिक्षक या पदावर कार्यरत आहेत.देशसेवा आणि समाजसेवा दोन्हीही कार्य त्यांच्या हातून घडत आहेत.समाजसेवा करण्याची उषा घाटे यांना प्रचंड आवड आहे. दर रविवारी गोरगरिब महिलांना वेळ देऊन त्यांच्या समस्या जाणून घेतात. विटभट्टी वर काम करणाऱ्या मुला मुलीचे शिकवणी वर्ग घेतात. मुलांच्या तब्बेतीची विचारणा करतात. त्यांना स्पोर्ट खेळ शिवतात,जेवण देतात.लहान मुलांना मदत केल्याने त्यांना वेगळाच



आनंद मिळतो. उषा घाटे यांनी न्यू पहाडसिंगपुरा येथे वृद्धाआश्रम सुरु केले, असून त्यांना बाहेरून आर्थिक साहाय्य किंवा मदत मिळत नसल्याने पूर्ण खर्च घरून करतात. लोकांनी जर उषःकाळ फाउंडेशनला आर्थिक मदत केल्यास उषा घाटे यांना गरिबांसाठी काम करण्यासाठी नवं भरारी मिळेल. पोलीस खात्यामध्ये नोकरी करत घर सांभाळून गोरगरिबांसाठी लढणारी संघर्षयोद्धाच आहे.



# कन्नड शहरात स्व.वसंतराव नाईक यांचे स्मारक करा

## अन्यथा जनआंदोलन करणार : प्रा. लखन चव्हाण

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** शहरात आणि ग्रामीण भागात युवा नेते लखन भाऊ चव्हाण यांनी विविध ठिकाणी स्व. महानायक वसंतराव नाईक यांच्या जयंती निमित्त भेट देऊन अभिवादन करताना समाज बांधव यांना आवाहन केले की सर्वांनी एक तरी झाड लावून त्या झाडाला जबाबदारीने मोठे करा आणि येणाऱ्या काळात जर कन्नड शहरात सर्वाधिक काळ मुख्यमंत्री राहिलेले हरित क्रांतीचे प्रणेते स्व.वसंतराव नाईक यांची जयंती करण्यासाठी त्यांचा स्मारक नसल्याने अभिवादन करायचे कुठे हार घालायचे कुठे हा प्रश्न आता आम्हा बंजारा समाजाला पडला आहे सर्व नेत्यांनी अनेक वेळा शब्द दिला जागा असून त्याच्यावर पाण्याची टाकू बांधली पण त्या जागेवर कब्जा देत नाही कायदेशीर जागा समाजाला अजून पर्यंत दिले नाही आता बंजारा समाजावर होत असलेला अन्याय थांबवा अन्यथा लवकरच जन आक्रोश आंदोलन,रास्ता रोको करण्यात येईल याची शासनाने दखल घ्यावी अनेक वर्षापासून आम्हाला नगरपालिका व त्यावर असलेले सत्ताधारी लोकांनी खोटे आश्वासन देत स्मारक होण्यासाठी टाळाटाळ करत आले आहे आता इथून पुढे टाळाटाळ चालणार नाही बंजारा समाजाला कमी लेखू नका बंजारा समाजाची एक महत्त्वपूर्ण बैठक घेऊन या बाबत लवकरच निर्णय घेऊन आंदोलन करणार असल्याचे युवा नेते लखन चव्हाण यांनी पिशोर नाक्यावर नाईक याना अभिवादन करताना बोलत होते सोबत अनेक महिला पारंपरिक वेशभूषेत उपस्थीत होत्या .



# रथासाठी साधू महाराजांना दिले एक लाख; पुरुषोत्तम धोंडगे यांनी जपली बांधिलकी

आधुनिक केसरी न्यूज

**धोंडीबा मुंडे**

**कंधार :** आषाढी वारीसाठी श्री साधु महाराज पायी दिंडी सोहळ्यात हजारो स्त्री-पुरुष, शेतकरी, वारकरी, भाविक भक्तांच्या मोठ्या प्रमाणात सहभाग होता. तिनशे वर्षाची समृद्ध परंपरा असलेल्या पायी दिंडी सोहळ्याने कंधार येथून शनिवारी दि.२९ जून रोजी पंढरपूरकडे प्रस्थान झाले. दिंडीचे शहरात जागो-जागी स्वागत करण्यात आले. प्रा.डॉ. पुरुषोत्तम धोंडगे यांनी सामाजिक बांधिलकी जपत येथील श्री संत साधू महाराज संस्थानच्या पायी दिंडीला रथासाठी एक लाख रुपये प्रदान केले.

कंधार येथून दरवर्षी पंढरपूरकडे पायी दिंडीचे प्रस्थान होत असते. या मानाच्या दिंडीला तीनशे वर्षाची परंपरा आहे. संस्थानचे आठवे वंशज मठाधिपती गुरुवर्य एकनाथ महाराज साधू यांच्या नेतृत्वाखाली दिनांक २९ जून रोजी दुपारी१२ वाजता साधू महाराजांच्या मठातून या पायी दिंडीचे प्रस्थान पंढरपूरकडे केले. या दिंडीत कंधार तालुक्यातील अनेक ठिकाणचे वारकरी मोठ्या आनंदाने विठू नामाचा गजर करीत मोठया संख्येने सहभागी झाले होते.

ही दिंडी लोहा तालुक्यातील किरोडा येथील गुराखीगडावर पोहचल्यावर दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी वारकऱ्यांचे चहा फराळ करून स्वागत करण्यात आले. प्रा.डॉ. पुरुषोत्तम धोंडगे यांनी साधू महाराज कंधारकर व वारकरी संप्रदाय विषयी असलेली श्रद्धा जपत साधू महाराजांच्या दिंडीला रथासाठी एक लाख रुपये दिले. दिवंगत डॉ.भाई केशवराव धोंडगे यांची वारकरी साप्रदायबद्दलची असलेली श्रद्धा व निष्ठा जोपासण्याचं कार्य आणि परंपरा प्रा.पुरुषोत्तम धोंडगे जोपासत आहेत.

# पैठण पंचायत समितीत कृषी दिन साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** महाराष्ट्र कृषी दिन 1 जुलै रोजी साजरा केला जातो. हरित क्रांतीचे जनक वसंतराव फुलसिंग नाईक यांच्या स्मरणार्थ हा दिवस साजरा केला जातो. हा दिवस महाराष्ट्र कृषी दिन किंवा महाराष्ट्र कृषी दिन म्हणूनही ओळखला जातो. याप्रसंगी पैठण पंचायत समिती कार्यालयात तहसीलदार सारंग चव्हाण यांच्या उपस्थितीत कृषी दिनाचे माहिती विशद करुन पैठण पंचायत समितीच्या आवारात वृक्षारोपण करण्यात आले. तालुका कृषी अधिकारी संदिप शिरसाठ यांनी कृषी दिनानिमित्त शेतकऱ्यांना शुभेच्छा देत शासनाच्या विविध योजनांची माहिती दिली.यावेळी कृषी आत्मा सल्लागार उमेश तट्टु,पैठण कृषी मंडळ अधिकारी राजेंद्र सरोदे,सह अरोग्य अधिकारी,व मडळ अधिकारी यांची उपस्थिती होती.



# भरधाव कारने वृद्ध पादचाऱ्याला उडवले

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** मलकापूर शहर परिसरात आज 'हिट अँड रन'ची घटना घडली. परप्रांतातील भरधाव कारने पायी जाणाऱ्या इसमाला उडवले. यात त्याचा करुण अंत झाला. या अपघाताचा अंगावर काटे आणणारा संपूर्ण घटनाक्रम सीसीटीव्हीमध्ये कैद झाला आहे. राष्ट्रीय महामार्ग ५३वर हॉटेल यादगारनजीक आज सोमवारी ही भीषण दुर्घटना घडली. भरधाव चारचाकी वाहनाने जोरात धडक दिल्यावर अपघातग्रस्त वृद्ध इसम अक्षरशः फुटबॉलसारखा हवेत भिरकावला गेल्याचे 'सीसीटीव्ही फुटेज'मध्ये दिसून येत आहे. धडक देणारी कार गुजरात राज्यातील असल्याचे प्राथमिक तपासात उघड झाले आहे. नामदेव तुकाराम कवळे (वय ५८) असे मृताचे नाव असून ते मलकापूर तालुक्यातील मौजे कुंड बु. येथील रहिवासी आणि गावाचे पोलीस पाटील असल्याचे प्राथमिक चौकशीत आढळून आले.तालुक्यातील कुंड बु. येथील रहिवासी तथा पोलीस पाटील नामदेव तुकाराम कवळे हे नेहमीप्रमाणे मलकापूरला येण्यासाठी घरातून बाहेर पडले. हॉटेल यादगारनजीक बस पकडण्यासाठी ते पायी जात होते. त्यावेळी मुंबईवरून नागपूरकडे जाणाऱ्या भरधाव (जीजे-१५, बीएफ-२५६४) कारने कवळे यांना जोरदार धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की, ते हवेत भिरगावले गेले आणि दूर अंतरावर जाऊन जमिनीवर कोसळले.

# लाडकी बहीण योजना ही महाराष्ट्राच्या बहिणींचा छळ करणारी : डॉ. अभिलाषा गावतुरे बेहेरे

आधुनिक केसरी न्यूज

**बल्लारपूर :** २०२४ – २५ अंतरिम अर्थसंकल्पात मोठ्या गाजेवाज्याने घोषणा केलेली 'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण' योजनेच्या जाचक अटी बघता असे लेक्षात येईल कि, हि योजना केवळ गरजू गरीब लाभार्थ्यांना लाभापासून कसे वंचित ठेवता येईल यावर जास्त भर देण्यात आला आहे. 'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण' या योजनेच्या अंमलबजावणीसाठी कालमर्यादा दिनांक १ जुलै २०२४ ते १५ जुलै २०२४ ठेवण्यात आली आहे. या १५ दिवसाच्या कालावधीत महिलेला अधिवास प्रमाणपत्र आणि २.५० लाख पेक्षा कमी उत्पनाचा दाखला काढून या आणि इतर कागदपत्रांसह ONLINE अर्ज करणे अपेक्षित आहे. परंतू महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ या कायद्यामध्ये या दोन्ही प्रमाणपत्र १५ दिवसाच्या कालावधीत नागरिकांना पुरवणे बंधनकारक आहे. जर सरकाने स्वतः मान्य करत आहे कि हे प्रमाणपत्र काढण्यासाठी १५ दिवसाचा कालावधी लागतो तर महिलांनी या कालावधीत प्रमाणपत्र काढायचे कधी आणि ONLINE अर्ज करायचा कधी ?महिला शिक्षित असो किंवा अशिक्षित असो, दिनांक १ जुलै २०२४ ते १५ जुलै २०२४ या १५ दिवसाच्या कालावधीत अधिवास प्रमाणत्र आणि २.५० लाख पेक्षा कमी उत्पनाचा दाखला काढण्यासाठी लागणारे महेरकडचे आणि सासरकडचे कागदपत्र आणि योजने साठी लागणारे इतर कागदपत्रांची जुडवा जुडव करायची कशी हे समजण्या पलीकडचे आहे. समजा ही कागदांची जुडवा-जुडव करण्याची जादू एका शिक्षित महिलेने केली आणि यशस्वीपणे ONLINE अर्ज करण्याची लढाई जिंकली पण अशिक्षित महिलांचे काय? अशा कितीतरी शिक्षित आणि अशिक्षित महिला या योजने पासून वंचित राहतील.



# खुलताबाद पंचायत समितीत वन महोत्सव उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** वनविभाग प्रादेशिक छत्रपती संभाजीनगर व वनविभाग सामाजिक वनिकरण छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विध्यमाने वनपरीक्षेत्र कार्यालय खुलताबाद प्रादेशिक व सामाजिक वनिकरण परीक्षेत्र खुलताबाद यांचे वतीने पंचायत समिती खुलताबादच्या प्रांगनात वनमहोत्सव २०२४-२५ अमृत वृक्ष आपल्या दारी या योजने अंतर्गत एक पेड माँ के नाम हा उपक्रम राबविण्याकरिता स्टॉल उभारण्यात आला सदर स्टॉलचे उदघाट्न प्रकाश नाईक, गट विकास अधिकारी पंचायत समिती खुलताबाद, एच. बी. कहाटे, विस्तार अधिकारी पंचायत समिती खुलताबाद तसेच श्रमती प्रतिभा कांबळे, विस्तार अधिकारी कृषी विभाग खुलताबाद यांचे हस्ते करण्यात आले. सदर उपक्रमाच्या माध्यमातून वनमहोत्सव २०२४-२५ निमित्त एक पेड माँ के नाम ही योजना प्रभावीरित्या पार पडली जावी यासाठी संपूर्ण खुलताबाद तालुक्यातील सर्व नागरिकांना, शासकीय, निमशासकीय विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था, शाळा, विध्यालय, महाविद्यालय व संरक्षणबल यांनी वनवीभागा कडून दिलेल्या निकषा प्रमाणे रोपे नेऊन त्याची जास्तीत जास्त लागवड करण्यात यावी असे आव्हान करण्यात आले. सदर स्टॉल च्या ठिकाणी श्रीमती प्रियंका भिसे, वक्षेत्रपाल सामाजिक वनिकरण खुलताबाद, वनपाल एम. एम. उधार, ए. डी. तगडा वनरक्षक के. पी. शिंदे, पी. के. घोंगटे, व्ही. ए. मोहिते उपस्तित होते.



# एक हजार वृक्ष लागवड करून कृषी दिन साजरा!

आधुनिक केसरी न्यूज

**धोंडीबा मुंडे**

**कंधार :** हरित क्रांतीचे प्रणेते,महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांची १११ वी जयंती सोमवारी, दि.१ जुलै रोजी कृषी दिन म्हणून साजरा करण्यात आली. यावेळी तालुका कृषी अधिकारी कंधार तसेच पंचायत समिती कंधार यांच्या संयुक्त विद्यमाने वसंतराव नाईक सभागृह पंचायत समिती कार्यालय कंधार येथे कृषी दिनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी गटविकास अधिकारी तथा प्रशासक पंचायत समिती कंधार महेश पाटील होते तर प्रमुख मार्गदर्शक डॉ.संतोष चव्हाण शास्त्रज्ञ कृषी विज्ञान केंद्र सगरोळी हे उपस्थित होते. हा कार्यक्रम वसंतराव नाईक सभागृहात आयोजित करण्यात आला होता. कंधार तालुक्यातील प्रगतिशील शेतकरी कृषी विभागातील सर्व अधिकारी कर्मचारी पंचायत समितीतील सर्व अधिकारी कर्मचारी यांची उपस्थिती होती, कृषी दिनानिमित्त सर्व कर्मचाऱ्यांना या आर्थिक वर्षांमध्ये शेतकऱ्यांना आर्थिक स्थर वाढवण्याच्या उद्देशाने कृषी विभागाच्या वेगवेगळ्या योजना प्रभावीपणे राबवून जास्तीत जास्त शेतकऱ्यांना लाभ कसा देता येईल व आर्थिक वर्षामध्ये फळबाग लागवड शेततळे जमीन आरोग्य सुधारण्यासाठी सेंद्रिय शेती इत्यादी विषयावर भर देण्यासाठी निश्चय केला जाणार आहे. या कार्यक्रमा वेळी डॉ.चव्हाण यांनी वेगवेगळ्या फळ पिकांच्या लागवडीबद्दल सखोल असे मार्गदर्शन केले तसेच महेश पाटील गटविकास अधिकारी कंधार यांनी केले कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन संभाजी वडजे कृषी सहाय्यक यांनी केले. तालुका कृषी अधिकारी कंधार वतीने कंधार तालुक्यातील गऊळ येथे माणिका बळीराम गिरे यांच्या शेतात एक हजार केशर आंब्याची लागवड करण्यात आली तसेच मधुकर कागणे भोजूचीवाडी यांच्या शेतावर शंभर केशर आंबा वृक्ष लागवड करून कृषी दिन साजरा करण्यात आला. यावेळी विठ्ठल गीते तालुका कृषी अधिकारी कंधार, माधव गुट्टे मंडळ कृषी अधिकारी पेठवडज, जीवन कळणे कृषी सहाय्यक,सतीश वाघमारे संजय माळी, सय्यद सरताज, संजय गुटे, भूषण पेटकर, हेमंत थोटे नामदेव कुंभारे व शेतकरी प्रभाकर व्यवहारे, विष्णू पाटील इंगोले, धोंडीबा राहेरकर, ओमप्रकाश पवळे, माणिक बळीराम गिरे मधुकर कागणे इत्यादी उपस्थित होते.





# मुख्यमंत्री – माझी लाडकी बहीण योजना

## पहिल्या टप्प्यात अर्ज करण्याची 15 जुलैपर्यंत मुदत

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** राज्यातील महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी, त्यांचे आरोग्य आणि पोषणामध्ये सुधारणा करणे, तसेच कुटुंबातील त्यांची निर्णायक भूमिका मजबूत करण्यासाठी शासनाने 'मुख्यमंत्री – माझा लाडकी बहीण योजना' सुरू केली आहे. योजनेची सुरूवात 1 जुलै पासून करण्यात आली असून पहिल्या टप्प्यातील अर्ज 1 ते 15 जुलैपर्यंत भरण्याची मुदत आहे. त्यानंतरही योजना सुरू राहील.



**योजनेचा उद्देश :** 1) राज्यातील महिला व मुलींना पुरेशा सोयी सुविधा उपलब्ध करून रोजगार निर्मितीस चालना देणे, 2 ) त्यांचे आर्थिक - सामाजिक पुनर्वसन करणे, महिलांना स्वावलंबी व आत्मनिर्भर करणे, 3) महिला व मुलींच्या सशक्तीकरणास चालना मिळणे, 4) महिला आणि त्यांच्यावर अवलंबून असलेल्या मुलांचे आरोग्य आणि पोषण स्थितीत सुधारणा करणे.

**लाभार्थी पात्रता :** 1) वय 21 ते 60 वर्षे असणारी महिला. 2) महाराष्ट्र राज्याची रहिवासी महिला. 3) विवाहित, विधवा, घटस्फोटित परित्यक्त्या, निराधार महिला. 4) कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न 2.5 लक्ष पेक्षा कमी असणे गरजेचे.

**अपात्रता :** 1) कुटुंबातील सदस्य आयकर दाता असल्यास, 2) सरकारी नोकरी, 3) आजी/माजी आमदार/खासदार 4) कुटुंबाच्या मालकीची 5 एकर पेक्षा जास्त जमीन असणारे, 6) चार चाकी गाडी असणारे.

**अर्ज करण्याची पद्धत :** अर्ज निःशुल्क अंगणवाडी सेविका यांचेकडे भारता येईल. अर्ज विहित नमुन्यात भरून व त्याला आवश्यक कागद जोडून अंगणवाडी सेविका, ग्रामसेवक, सेतू केंद्र, वार्ड अधिकारी यांना देता येईल. वरील सर्वांकडून अर्ज ऑनलाईन भरून घेता येईल. **आवश्यक कागदपत्रे :** योजनेच्या लाभासाठी ऑनलाईन अर्ज, लाभार्थ्यांचे आधारकार्ड, महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र / महाराष्ट्र राज्यातील जन्म दाखला. सक्षम प्राधिकारी यांनी दिलेला कुटुंब प्रमुखाचा उत्पन्नाचा दाखला (वार्षिक उत्पन्न 2.50 लाखांपर्यंत असावे), बँक खाते पासबुकच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत, पासपोर्ट आकाराचा फोटो, रेशनकार्ड, सदर योजनेच्या अटी शर्तीचे पालन करण्याबाबतचे हमीपत्र. अडचणी असल्यास येथे करा संपर्क : अर्ज भरतांना काही समस्या असल्यास जिल्हा स्तरावर सुविधा केंद्र स्थापन केले आहे. त्यासाठी संपर्क क्रमांक 7972059274 तसेच महिला हेल्प लाईन 181 वर संपर्क करता येईल. अर्जासाठी लागणारे उत्पन्न दाखले तसेच रहिवासी प्रमाणपत्रे तयार करण्यासाठी विविध पातळीवर नगरपालिका मुख्याधिकारी, महानगरपालिका अधिकारी, तहसीलदार यांनी कॅम्प आयोजित करून अर्ज भरण्याची प्रक्रिया सुलभ करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. तसेच मुख्य कार्यपालन अधिकारी विवेक जॉन्सन यांनी दिल्याचे महिला व बालविकास अधिकारी दीपक बानाईत यांनी कळविले आहे.



# मुखेड येथे छत्रपती शाहू महाराज यांची जयंती उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**मुखेड :** आरक्षणाचे जनक छत्रपती शाहु महा- राज यांची जयंती मुखेड येथे दि.३० जुन रोजी उत्साहात साजरी करण्यात आली. जयंतीनिमित्त छत्रपती शाहु महाराज चौक कंधार फाटा येथे महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरूवात कंधार फाटा मुखेड येथे छत्रपती शाहु महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादनाने करण्यात आली त्यानंतर शिवसेना शिंदे गटाचे नेते प्रभाकर पाटील तांदळीकर यांच्या हस्ते धव्जारोहन करण्यात आले. सायकांळी ५ वाजताच्या दरम्यान छत्रपती शाहु महाराज यांच्या तैलचित्राची मुखेड शहरातील मुख्य रस्त्याने भव्य मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीत डीजे च्या तालावर तरुणाईने एकच ठेका धरला. जयंती मोठ्या हर्षोउल्हासात साजरी करण्यात आली. यावेळी शिवसेनेचे प्रभाकर पाटील तांदळीकर, राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष संभाजी पाटील मुकनर, शहराध्यक्ष नागनाथ गायकवाड, वैद्यकीय संस्थेचे सचिव डॉ. श्रिहरी बुडगेमवार, ॲड संजय भारदे, ॲड तानाजी वाघमारे, राजमुद्रा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष सचिन पाटील इंगोले, कमलकिशोर देशमुख, पत्रकार महेताब शेख, बबन दबडे, कृषी विस्तार अधिकारी शिंदे, शंकर वड्डेवार, विश्वा गायकवाड, शिवानंद बंडे, सदानंद पा.जाधव, बालाजी पा.वडजे, सुधीर रॅपनवाड, बबल्लु देवकत्ते, गजानन साखरे, बालाजी पाटील हातराळकर यांची प्रमुख उपस्थिती होती. सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचलन मनोज ढवळे यांनी केले तर प्रस्ताविक कार्यक्रमाचे आयोजक आशिष भारदे यांनी केले. उपस्थितांचे आभार जयंती मंडळाचे अध्यक्ष माधव देवकत्ते यांनी मानले. यावेळी सतिश गायकवाड, प्रवीण मोरे, प्रभाकर सादगीर, शिवम डोंगरे, संदेश भालेराव, किरण घोडके, शकील शेख, अनिल वाघमारे सह अनेकजण उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वितेसाठी जयंती मंडळाचे अध्यक्ष माधव देवकत्ते, विजय लोहबंदे, आशिष भारदे, किशोर लोहबंदे यांच्यासह छत्रपती शाहु महाराज जयंती महोत्सव समितीचे पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले. छत्रपती शाहु महाराज यांच्या जयंतीनिमित्त मुखेड शहारातुन काढण्यात आलेल्या भव्य मिरवणुकीत जिल्हा परिषद केंद्रिय प्राथमीक शाळा ब्राँच मुखेड या शाळेच्या विध्यार्थ्यांच्या लेझीम पथकाने सहभाग घेवुन आपल्या लेझीम नृत्याने मुखेडकरांची मने जिकंत लक्ष वेधले.

# मेट्रो स्थानकात प्रवाशाचा मृत्यू; सरकत्या जिन्यावरून उतरताना घटना

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** जिल्हा न्यायालय मेट्रो स्थानकात सोमवारी एका प्रवाशाचा मृत्यू झाला. हा प्रवासी स्थानकातील सरकत्या जिन्यावर अचानक पडला. त्याला तातडीने रुग्णालयात हलविण्यात आले. परंतु, तिथे पोहोचण्याआधीच त्याचा मृत्यू झाला. या प्रवाशाच्या मृत्यूचे नेमके कारण पोलीस तपासत आहेत. या प्रवाशाचे नाव मनोज कुमार (वय ४०) आहे. तो सायंकाळी ६.३० वाजता स्थानकातील सरकत्या जिन्यावरून जात होता. त्यावेळी तो अचानक जिन्यावर पडला. स्थानकातील सुरक्षारक्षकांच्या निदर्शनास ही बाब आली. त्यांनी तातडीने त्या प्रवाशाला स्थानकातील आपत्कालीन वैद्यकीय कक्षात नेले. तिथे कक्षातील डॉक्टर आणि परिचारिकेने या प्रवाशावर तातडीने प्राथमिक उपचार केले. त्यानंतर त्याची गंभीर स्थिती पाहून त्याला जवळच्या खासगी रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र रुग्णालयात पोहोचण्यापूर्वीच त्याचा मृत्यू झाला. महामेट्रोच्या अधिकाऱ्यांनी शिवाजीनगर पोलिसांना या घटनेची माहिती दिली. पोलिसांनी प्रवाशाचा मृतदेह शवविच्छेदनासाठी ससून रुग्णालयात पाठविला आहे. या प्रवाशाचा मृत्यू कशामुळे झाला, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. त्याच्या शवविच्छेदनात मृत्यूचे नेमके कारण समोर येईल. प्रवाशाला काही आजार होता का, याचाही उलगडा शवविच्छेदन अहवाल हाती आल्यानंतर होणार आहे.

# शिक्षकी पेशातच मिळतो खरा आनंद

## डॉ. दीपक पाटील यांचे प्रतिपादन : म्युनिसिपल हायस्कूलचे मुख्याध्यापक ललितकुमार फिरके यांचा सेवामूर्ती सन्मानपत्र देऊन गौरव

आधुनिक केसरी न्यूज

**भुसावळ :** उदरनिर्वाहाचे साधन म्हणून नोकरी केली जाते. प्रत्येक क्षेत्रात काम केल्यानंतर त्याचे वेतन मिळते. मात्र शिक्षकी पेशात वेतनासोबतच लहान मुलांमध्ये रमण्याचा व त्यांचे उज्ज्वल भविष्य घडविण्याचा आनंद मिळत असतो. समाजात शिक्षकांप्रती असलेली आदराची भावना व मिळत असलेला सन्मान यामुळे शिक्षकी पेशातच खरा आनंद असल्याचे प्रतिपादन आळंदी देवाची येथील श्रीसंत ज्ञानेश्वर शिक्षण प्रसारक मंडळाचे खजिनदार डॉ. दीपक पाटील यांनी केले. भुसावळ येथील म्युनिसिपल हायस्कूलमध्ये आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी म्युनिसिपल हायस्कूलच्या ज्येष्ठ शिक्षिका सरला सावकारे तर प्रमुख पाहुणे म्हणून निळकंठ फिरके, हेमंत अलोने, आर.सी. गोसावी, सौ. संगीता फिरके व सत्कारार्थी म्युनिसिपल हायस्कूलचे मुख्याध्यापक ललितकुमार फिरके उपस्थित होते. प्रारंभी नाना पाटील यांनी परिचय करून दिला. त्यानंतर म्युनिसिपल हायस्कूल व द.शि. विद्यालयातर्फे श्री. फिरके यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. आपल्या मनोगतात डॉ. जगदीश पाटील म्हणाले की, शिक्षणक्षेत्रासह इतर क्षेत्रात कार्यरत राहून फिरके सरांनी आनंददायी शैक्षणिक कारकीर्दीतून स्वतःची आगळीवेगळी ओळख



निर्माण केली असून नाविन्यपूर्ण कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटविला आहे. प्रा. आर.वाय. पाटील यांनी लहानपणापासूनची मैत्री व शिक्षण याविषयी सांगून त्यांच्या शैक्षणिक कारकीर्दीचा आढावा घेतला. संजयसिंग चव्हाण यांनी त्यांच्या परखड व भावनिक स्वभावाविषयी सांगितले. अवधूत दामोदरे यांनी त्यांचा वाचन अनुभव सांगितला. सुनील भिरूड यांनी शैक्षणिक क्षेत्रातील योगदान कथन केले. जयंत चौधरी यांनी शैक्षणिक व सामाजिक कार्याचा आढावा घेतला. नरेंद्र राठोड यांनी शाळेचे अनुभव सांगितले. सीमा भारंबे यांनी कविता सादर केली. सुभाष मेढे यांनी सहकारी शिक्षक म्हणून अनुभव सांगितले. आर.सी. गोसावी यांनी त्यांच्या कार्याची शैली सांगितली. अध्यक्षीय मनोगतात सरला सावकारे यांनी फिरके सरांच्या मुख्याध्यापक कालखंडातील उल्लेखनीय कार्याचे कौतुक केले. त्यानंतर डॉ. जगदीश पाटील यांच्यातर्फे मुख्याध्यापक ललितकुमार फिरके यांना सेवापूर्ती सेवामूर्ती सन्मानपत्र प्रदान करण्यात आले. सन्मानपत्राचे वाचन मुख्याध्यापक नितीन झांबरे यांनी केले. सत्कारार्थी मनोगतातून श्री. फिरके यांनी सर्वांप्रती आभार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रदीप साखरे यांनी केले तर आभार रेखा सोनवणे यांनी मानले. कार्यक्रमाला सर्वच स्तरातील स्नेहीजणांची उपस्थिती होती.

# प्रधानमंत्री पीक विमा योजनेत सहभागी व्हा

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** सावळदबारा परिसरात शेतकऱ्यांनी खरीप हंगाम 2024 करिता कर्जदार व बिगर कर्जदार शेतकऱ्यांना प्रधानमंत्री पीक विमा योजनेत सहभागी व्हा असे आवाहन सोयगाव कृषी विभागाच्या वतीने तालुका कृषी अधिकारी मदन शिसोदिया यांनी केले आहे.सहभागी होण्याची अंतिम मुदत 15 जुलै 2024 आहे. केवळ 1 रुपये प्रती अर्ज एवढी रक्कम भरून पीक विमा पोर्टलवर विम्याची नोंदणी करण्याचे आवाहन सिल्लोड उप अधिक्षक कृषी अधिकारी सुभाष आघाव व तालुका कृषी अधिकारी मदन शिसोदिया यांनी केले आहे. राज्यात खरीप हंगाम 2016 पासून प्रधानमंत्री पीक विमा योजना राबविण्यात येत आहे. खरीप हंगाम 2020 पासून तीन वर्षांसाठी राज्यात ही योजना राबविण्यास मान्यता देण्यात आली होती. केंद्र शासनाच्या सूचनेनुसार खरीप हंगाम 2023 ते रब्बी 2025-26 हंगाम या तीन वर्षाकरिता अधिसुचित पीकांसाठी विमा क्षेत्र घटक धरून 'सर्वसमावेशक पीक विमा योजना' राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. विमा कंपन्यांची अंमलबजावणी यंत्रणा म्हणून या तीन वर्षांसाठी निवड करण्यात आली आहे. जिल्हावार विमा कंपन्यांची नावे व टोल फ्री क्रमांक छत्रपती संभाजीनगर जिल्हयासाठी चोलामंडलम एम एस जनरल इन्शुरन्स कंपनी असून 14447 हा टोल फ्री क्रमांक आहेत. पीक विमा योजनेंतर्गत या जोखमींचा समावेश हवामान घटकांच्या प्रतिकुल परिस्थितीमुळे पिकांची पेरणी किंवा लावणी न झाल्यामुळे होणारे नुकसान, स्थानिक नैसर्गिक आपत्ती आणि काढणी पश्चात नुकसान या जोखमींचा प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत समावेश करण्यात आला आहे. आवश्यक कागदपत्रे आधारकार्ड, 7/12 उतारा, 8 अ, आधार संलग्न बैंक पासबुक या कागदपत्रांसह शेतकऱ्यांना नजीकच्या बैंक शाखेत तसेच आपले सेवा केंद्रामध्ये विहित मुदतीत विमा हप्ता भरुन सोयगाव तालुक्यातील शेतकऱ्यांनी सहभागी व्हा असे आवाहन कृषी अधिकारी मदन शिसोदिया यांनी केले आहे.

# राज्यस्तरीय योगासन स्पर्धेत विठ्ठल कडू, दीपा नारकर विजेते

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** मनो-वर्धन योगसंस्था व क्रीडाभारती तर्फे आयोजित केलेल्या राज्यस्तरीय योगासन स्पर्धेतील ३१ ते ५० वर्षे पुरूष व महिला या वयोगटात अनुक्रमे विठ्ठल कडू व दीपा नारकर यांनी प्रथम क्रमांक पटकाविला.
ही स्पर्धा प्र.ल.गावडे सभागृह, भावे स्कूल पुणे येथे आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत पुणे, नाशिक, सातारा, मुंबई इत्यादी ठिकाणच्या शंभरहून अधिक खेळाडूंनी भाग घेतला. १६ ते ३० वर्षे पुरुष व महिला गटात अनुक्रमे सार्थक हर्षा व सानिका केळकर यांनी प्रथम स्थान घेतले. ५१ ते ६५ वर्षे वयोगटात नागेश धर्माधिकारी यांनी पुरुष गटात प्रथम स्थान मिळविले तर महिला गटात मंगल गवळी विजेत्या ठरल्या. ६६ वर्षावरील गटात धनालाल भोरटक्के व कल्याणी गाडगीळ हे अनुक्रमे पुरुष व महिला गटातील विजेतेपदाचे मानकरी ठरले.




या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ पद्मश्री पुरस्कार विजेते व आंतरराष्ट्रीय मल्लखांब प्रशिक्षक उदय देशपांडे यांच्या हस्ते झाला. यावेळी क्रीडाभारती संस्थेचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष विजय पुरंदरे, पुणे महानगर अध्यक्ष प्रा.शैलेश आपटे, पुणे महानगर मंत्री विजय राजपूत,पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्षा शकुंतला खटावकर, मनो-वर्धन योगसंस्थेचे संचालक मनोज पटवर्धन, सहसंचालिका माधुरी पटवर्धन, सहसंचालक स्वानंद पटवर्धन,परीक्षक म्हणून सोनाली कानिटकर,चंद्रशेखर कुलकर्णी यांनी काम पाहिले.
स्पर्धेचे व्यवस्था प्रमुख म्हणून क्रीडा भारतीचे सहमंत्री भाऊराव खुणे यांनी यशस्वीपणे जबाबदारी सांभाळली.गटवार निकाल -१६ ते ३० वर्षे पुरुष-१. सार्थक हर्षा,२. सायलेन जेठी, ३.ओम कुशवाह. महिला-१.सानिका केळकर,२. श्रद्धा दीक्षित,३. निकिता वाघमारे, उत्तेजनार्थ- अनुश्री जोशी. ३१ ते ५० वर्षे पुरूष-१.विठ्ठल कडू,२. कुल्पोका स्वामी,३. संतोष माळी, ४. चैतन्य कुलकर्णी.महिला-१.दीपा नारकर, २.सायली शिंत्रे,३.सीमा पवार. उत्तेजनार्थ-सुनीता सोनावणे. ५१ ते ६५ वर्षे-पुरूष-१.नागेश धर्माधिकारी,२.जगदीश टेकचंदानी,३. ज्ञानेश्वर पाटील,४.सुहास गोंधळेकर. महिला-१.मंगल गवळी, २.सविता ओतूरकर व संगीता नास्ते, ३.स्वाती किनरे व वसुधा जोशी. ६६ वर्षावरील पुरुष -१. धनालाल भोरटक्के,२. शंकर आव्हाळे, ३.विनायक मुसळे,४. प्रकाश क्षीरसागर. महिला-१.कल्याणी गाडगीळ, उत्तेजनार्थ-नीला पेठे.




# नाट्यांजली अकॅडमीचे घवघवीत यश

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** मुंबई येथील अखिल भारतीय गंधर्व महाविद्यालयाच्या मंडळाने घेतलेल्या भरत नाट्यम परीक्षेत नाट्यंजली अकॅडमी जालनाची विद्यार्थिनी कु साक्षी सुशील व्यवहारे ही भरतनाट्यम विशारद पूर्ण परीक्षेत प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाली कु साक्षी ही अकॅडमी येथे दहा वर्षापासून प्रशिक्षण घेत आहे. मागील 35 वर्षापासून अनेक विद्यार्थिनी या अकॅडमी मार्फत प्रशिक्षण घेऊन यशस्वी झाले मध्यमा पूर्ण मधून अनुष्का चौधरी, सुरेश्वरी कोहाळे आणि हर्षिता झंवर तसेच माध्यमा प्रथम मधून वीरा अग्रवाल यशोनी कटारिया आणि आदिती रुणवाल या सर्व प्रथम श्रेणीत येऊन नाट्यंजली अकॅडमी ची परंपरा कायम ठेवली या सर्वांना भरत नाट्यमच्या गुरु सौ विद्या शंकर राव यांचे मार्गदर्शन लाभले.

# पहूर - लोहारा मार्गावर तुंबला तलाव

आधुनिक केसरी न्यूज

**पहूर :** येथून एकुलती मार्गे लोहाऱ्याकडे जाणाऱ्या रस्त्यावर पहूर कसबे जिल्हा परिषद उर्दू शाळेच्या नजीक खड्डा पडल्याने त्यात पावसाचे पाणी साचले आहे. रस्त्यावरच पाणी साचल्याने वाहनचालकांसह स्थानिक रहिवाशांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. याविषयी स्थानिक नागरिकांनी चक्क सोशल मीडियावरच या समस्येचे छायाचित्र व्हायरल करून संबंधितांचे लक्ष वेधले आहे. या मार्गावर वाहतूक मोठ्या प्रमाणात असते. जिल्हा परिषद उर्दू शाळेजवळ साईड पट्ट्या अजूनही भरलेल्या नाहीत . एकीकडे शाळा तर दुसरीकडे विजेचा खांब असल्याने वाहन चालकांना तारेवरची पसरत करावी लागते. याच परिसरात जिल्हा परिषद मराठी शाळा, जिल्हा परिषद उर्दू शाळा , उर्दू मिलत हायस्कूल, चिमुकल्यांच्या दोन अंगणवाड्या तसेच मंगल कार्यालय देखील आहे. या मार्गावर नेहमीच वाहतुकीची तसेच छोट्या बालकांसह ग्रामस्थांची ये -जा असते .त्यातच आता पावसाळ्यात रस्त्यावरच पाणी साचल्याने नागरिकांना त्रास होत आहे. या मार्गावरील साईड पट्ट्या दुरुस्त कराव्यात , पुढे शाळा आहे वाहने हळू चालवा अशा स्वरूपाचे फलक लावण्यात यावेत.







# विद्यार्थी हाच शिक्षणाचा केंद्रबिंदू मानून त्याचा विकास झाला पाहिजे : डॉ टाले

आधुनिक केसरी न्यूज

**मेहकर :** तालुक्यातील अंजनी बु! येथिल डॉ. जाकीर हुसैन उर्दु प्राथमिक शाळा अंजनी बु येथे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक साहित्य व पुषपगुच्छ देऊन स्वागत केले. निसर्गाने जसे तुमचे पावसाच्या रूपाने स्वागत केले. तसे आम्ही तुमचे पुष्प, पाठ्यपुस्तक, देऊन स्वागत करीत आहोत या शैक्षणिक साहित्याचा जास्तीत जास्त वापर करून आपल्या गुणवत्तेत वाढ करण्याचा प्रयत्न करा आज जिकडे तिकडे मुलीचा धबधबा निकालात दिसत आहे त्यासाठी मुलांनी सुद्धा अभ्यासात स्वतःला गुंतून घ्यावे. शाळेला नेहमीच उपस्थित राहावे अभ्यास करावा, शाळेतील जास्तीच्या अनुपस्थितीमुळे विद्यार्थ्यांचे प्रगती होत नसते म्हणून आजचे शिक्षण हे विद्यार्थी केंद्र शिक्षण असून विद्यार्थी हाच शिक्षणाचा केंद्रबिंदू मानून त्यांचा सर्वांगीण विकास झाला पाहिजे विद्यालयात विद्यार्थ्यांसाठी दर्जेदार उपक्रम राबवले जातात. शाळेचे वातावरण विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासास पोषक आहे. नवीन शैक्षणिक वर्षाच्या विद्यार्थ्यांना व शिक्षकांना शुभेच्छा ही दिल्या. उन्हाळ्याच्या सुट्ट्या संपल्यानंतर १जूलै पासून ग्रामीण भागात नवीन शैक्षणिक वर्षाला सुरुवात झाली. नवगतांचे स्वागत नवगतांचे स्वागत व प्रवेशोत्सव कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाचे स्वागत आणि प्रास्ताविक मुख्याध्यापक मोहम्मद सलाहोद्दीन शेख यांनी केले. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष डॉक्टर ज्ञानेश्वर टाले व डोणगाव अर्बन को ऑफ क्रेडिट सोसायटीचे अध्यक्ष ऋशांक चव्हाण शाळेचे सीईओ ज़ैनुल आबेद्दीन यानी विद्यार्थी व विद्यार्थिनींचे गुलाब फूल देऊन स्वागत करण्यात आले आणि पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले. इयत्ता पहीला ला प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे हार्दिक स्वागत पाचवीच्या विद्यार्थ्यांनी पुष्पवृष्टी आणि टाळ्याच्या गजरात केले. शालेय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत गोड खीर विद्यार्थ्यांना देऊन पहिला दिवस गोड करण्यात आला. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुख्याध्यापक मोहम्मद सलाहुद्दीन शेख यांनी केले. तर आभार प्रदर्शन नगमा परवीन मोहम्मद अझरुद्दीन यांनी मानले. यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हा अध्यक्ष डॉक्टर ज्ञानेश्वर टाले डोणगाव अर्बन को ऑफ क्रेडिट सोसायटीचे अध्यक्ष ऋशांक चव्हाण शाळेचे सीईओ कार्यक्रम ज़ैनुल आबेद्दीन यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक मोहम्मद सलाहुद्दीन शेख, नगमा परवीन मोहम्मद अझरुद्दीन, नूर सलमा शेख शाळेतील शिक्षकेतर कर्मचारी, पालक, विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.

## लाडकी बहीण योजनेत येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी विशेष कक्ष सुरू करा : आ. जोरगेवार

आधुनिक केसरी न्यूज



**चंद्रपूर :** राज्य शासनाच्या वतीने मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना सुरू केली आहे. यामुळे महिलांना आर्थिक पाठबळ मिळणार आहे. मात्र, या योजनेतील काही अटी रद्द करण्यात याव्यात तसेच महिलांना कागदपत्र तयार करताना येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी विशेष कक्ष तयार करण्यात यावा, अशी मागणी आमदार किशोर जोरगेवार यांनी अधिवेशनात बोलताना केली आहे. मुंबई येथील अधिवेशनाच्या चौथ्या दिवशी राज्यपालांच्या अभिभाषणावर बोलताना आमदार किशोर जोरगेवार यांनी चंद्रपूरातील विविध विषयांकडे सभागृहाचे लक्ष वेधले. यावेळी बोलताना आ. जोरगेवार म्हणाले की, नद्यांना पूर आल्याने होणाऱ्या नुकसानीसाठी सरकारने केलेल्या योजनांचे आहे. सोबतच चंद्रपूरात इरई नदीला दरवर्षी पूर येतो, त्यामुळे मोठे नुकसान होत आहे. ही बाब लक्षात घेता इरई नदीवर संरक्षण भिंत बांधण्यात यावी, अशी मागणी यावेळी अधिवेशनात बोलताना आ. जोरगेवार यांनी केली आहे. पर्यटनामुळे सर्वाधिक रोजगार उपलब्ध होत असतो. चंद्रपूरातही पर्यटनदृष्ट्या विकास केला गेला पाहिजे. चंद्रपूरात जगप्रसिद्ध ताडोबा अभयारण्य आहे. प्राचीन महाकाली मंदिर चंद्रपूरात आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पद स्पर्शाने पवित्र झालेली दिक्षाभूमी येथे आहे. येथे औद्योगिक आणि मायनिंग पर्यटन होऊ शकते, त्यामुळे येथे टुरिझम सर्किट तयार करण्यात यावे, अशी मागणी यावेळी बोलताना आमदार किशोर जोरगेवार यांनी केली आहे. चंद्रपूरात इरई नदी हे एकमात्र पाण्याचे स्रोत आहे. येथील पाणी उद्योगासाठी, पिण्यासाठी आणि शेतीसाठी वापरले जाते. त्यामुळे दुसरा पाण्याचा स्रोत तयार करण्याची गरज आहे. ही बाब लक्षात घेता धनोरा बॅरेज सरकारने तयार करावा, अशी मागणी त्यांनी यावेळी केली आहे. शासकीय महाविद्यालयाचे काम जवळपास पूर्ण झाले आहे, ते लवकर सुरू करण्यात यावे, अशी मागणीही केली आहे.

## वाहतूक नियम तोडणाऱ्या बेशिस्त वाहनधारकांना जामर लावून दंड

### नो पार्किंग ठिकाणी वाहतूक शाखेचा दणका

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरात दुचाकी व चारचाकी वाहनांची संख्या हि मोठ्या प्रमाणात वाढली असुन वाहन धारक हे आपले वाहने शिस्तीत न लावता रहदारीस अडथळा निर्माण होईल अशा प्रकारे लावतात. तसेच शहरात काही ठिकाणी नोपार्किंग बोर्ड लावणेत आलेले असतांना देखील सदर ठिकाणी वाहन धारक हे आपली वाहने बेशिस्त पणे लावतात त्यामुळे शहरातील रहदारीस मोठ्या प्रमाणात अडथळा निर्माण होतो. अशा वाहन धारकांना शिस्त लागावी व शहरातील वाहतुक व्यवस्था सुरळीत राहावी म्हणुन शहर वाहतुक शाखेकडुन मा. पोलीस अधीक्षक सो यांचे आदेशाने जामर खरेदी करण्यात आलेले आहेत.

काल दुफार पावतो शहरातील गरुड कॉम्प्लेक्स व कराची चौक याठिकाणी रस्त्यावर रहदारीस अडथळा निर्माण होईल अशा प्रकारे वाहने लावणाऱ्या वाहन धारकांच्या वाहनांना जामर लावुन त्यांचेवर मोटार वाहन कायदयान्वये कारवाई करण्यात येवुन प्रत्येकी ५००/-रुपये दंड वसुल करण्यात आला आहे. शहरातील वाहन धारक यांनी आपले वाहने रहदारीस अडथळा होणार नाही अशा प्रकारे लावावीत नो पार्किंग चे बोर्डाचे ठिकाणी आपली वाहने लावु नयेत बाबत भुषण कोते सह. पोलीस निरीक्षक शहर वाहतुक शाखा धुळे यांनी आवाहन केले आहे.






## डोणगाव-आरेगाव रस्ता तत्काळ सुरू करावा

आधुनिक केसरी न्यूज

**मेहकर :** स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने जिल्हाध्यक्ष डॉ. ज्ञानेश्वर टाले यांनी २५/१०/२०२३ रोजी याबाबत निवेदन दिले होते त्यावेळी सदर कामाला बी.बी.एम टाकून कामाला सुरुवात करण्यात आली होती मात्र काही दिवसानंतर पुन्हा सदर काम बंद पडल्यामुळे स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे शहराध्यक्ष डोणगांव वैभव आखाडे यांनी सुद्धा परत दि.३१/१/२०२४ निवेदन दिले व दि.२८/५/२०२४ ला स्मरणपत्र देऊन मागणी केली होती. तसेच उपविभागीय अभियंता मेहकर यांच्या कार्यालयात डोणगाव ते आरेगांव रस्ता तात्काळ सुरू करण्याबाबत बऱ्याच वेळा निवेदने तक्रारी दिल्या असून सुद्धा ठेकेदार काम सुरू करत नसल्यामुळे सदर रस्त्याने अपघात होऊन नागरिकांना त्याचा त्रास होत असल्याचे नमुद केले वेळोवेळी कळवले मात्र त्यावर कुठलीही कार्यवाही होत नसल्यामुळे आज स्वाभिमानचे जिल्हाध्यक्ष डॉ.ज्ञानेश्वर टाले यांचे नेतृत्वामध्ये उपविभागीय अभियंता सार्वजनिक बांधकाम उपविभाग मेहकर यांच्या दालनात आज ठिय्या आंदोलन करण्यात आले व इशारा देण्यात आला की सदर रस्त्याचे काम तात्काळ सुरू करावे अन्यथा आम्ही कार्यालयातुन उठणार नाही अशी भूमिका घेताच बांधकाम प्रशासनाच्या वतीने लगेच काम चालू करणे बाबत लेखी दिले दोन दिवसात सर्व मटेरियल पाठवुन काम सुरु करण्यात येईल.व सर्व अतिक्रमण धारकांना नोटीस दिल्या असून तात्काळ अतिक्रमण काढण्याची कारवाई पोलीस प्रशासनाकडून बंदोबस्त घेऊन सदर अतिक्रमण तात्काळ काढण्यात येईल असे सांगितले त्यानंतर तात्पुरते आंदोलन स्थगित करण्यात आले यावेळी स्वाभिमानचे तालुका अध्यक्ष गणेश गारोळे पक्ष तालुका अध्यक्ष कैलास उतपुरे स्वाभिमानचे शहराध्यक्ष डोणगाव वैभव आखाडे अरुण मुधळकर,सलीम शहा गजानन होनमणे,सुरेश खरात,प्रदीप वानखेडे,रुपेश खोरणे,वसुदेव पाटील नारायण क-हाळे.

## साप्ताहिक -वृत्तपत्रांच्या मागण्यांसाठी निवेदन देण्यासाठी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे : बागडी

आधुनिक केसरी न्यूज



**जालना :** मागील अनेक वर्षांपासून या स्थानिक वर्तमानपत्रांच्या अनेक मागण्या प्रलंबित आहेत. याकडे सातत्याने दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे साप्ताहिकांच्या विविध मागण्यांसाठी व्हाईस ऑफ मिडीया साप्ताहिक विंगच्या वतीने राज्यभरात दि. 04 जुलै रोजी निवेदन देण्यात येणार असून यावेळी जिल्ह्यातील जास्तीत जास्त पत्रकारांनी उपस्थित रहावे, असे आवाहन व्हाईस ऑफ मिडीया साप्ताहिक विंग महाराष्ट्र कार्यकारिणी सदस्य विकासकुमार बागडी यांनी केले आहे. जालना जिल्ह्यातही 04 जुलै रोजी व्हाईस ऑफ मिडीया साप्ताहिक विंगच्या वतीने सकाळी 11.00 वाजता जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात येणार आहे. आगामी विधानसभा निवडणुकीमध्ये दैनिकाप्रमाणेच साप्ताहिकांनाही जाहिरातीचे वितरण व्हावे, साप्ताहिक वृत्तपत्राची द्वीवार्षिक पडताळणी पाच वर्षात करा, साप्ताहिक वृत्तपत्राच्या जाहिरातीची दरवाढ करावी, अधिस्वीकृती धारक पत्रकारांना एसटी महामंडळात परिवारासह सवलत देण्यात यावी, रेल्वे प्रवासासाठी अधिस्वीकृती धारकांना शंभर टक्के सवलत सुरू करावी, पत्रकारांसाठी आरोग्य विमा व मोफतमध्ये उपचाराची सवलत देण्यात यावी, आर एन आय कडून नवीन नियमावलीनुसार लादण्यात आलेल्या जाचक अटी रद्द कराव्यात. जिल्ह्यातील सर्वसाधारण पत्रकारांना पत्रकार संरक्षण कायद्याअंतर्गत संरक्षण देण्यात यावे व कायद्याची शंभर टक्के अंमलबजावणी करण्यात यावी, इच्छूक व गरजवंत पत्रकारांना हमखास शस्त्र परवाना देण्यात यावा, पत्रकारांच्या पाल्यांना प्राथमिक आणि उच्च शिक्षण मोफत करण्यात यावे, जालना जिल्ह्यात सध्या गुन्हेगारी वाढली असून पत्रकारांच्या तक्रारीवर तात्काळ दखल घेण्यात यावी, ज्या ज्येष्ट पत्रकारांना तात्काळ पेन्शन सुरु करण्यात यावी आदी मागण्या यावेळी करण्यात येणार आहेत. तरी यावेळी जिल्ह्यातील जास्तीत जास्त पत्रकारांनी सहभागी राहून आपली समस्या मांडावी.

# कन्नड तालुक्यातील विमाधारकांना न्याय देण्याच्या लेखी आश्वासनामुळे धरणे आंदोलन तात्पुरते स्थगित

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील 1,53,678 शेतकऱ्यांनी खरीप हंगाम 2023-24 मध्ये कपाशी, मका इत्यादी पिकाचा पिक विमा काढला होता. यापैकी 52 हजार नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचा विमा क्लेम मंजूर करण्यात आला. मात्र 71 हजार शेतकरी यांनीही विमा उतरवला होता व वरील 52 हजार क्लेमधारकांच्या शिवारातील, गावातील हे शेतकरी होते.व या शेतकऱ्यांनी वेळेत तक्रार केली होती.मात्र एम एच चोला या कंपनीने याबाबत 71 हजार शेतकऱ्यांवर अन्याय करून त्यांच्या क्लेम रद्द केला होता. याबाबत सहसंचालक कृषी, कृषी अधीक्षक, उपविभागीय अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, तहसीलदार कन्नड यांना याबाबत वेळोवेळी मागणी करून ठोस कार्यवाही न झाल्यामुळे 1 जुलैला अन्यायग्रस्त शेतकऱ्यांनी तहसील कार्यालय समोर धरणे आंदोलन सुरू केले होते.सदर आंदोलनस्थळी तालुका कृषी अधिकारी बाळराजे मुळीक, चोला कंपनीचे क्लस्टर मॅनेजर हेमंत शिंदे यांनी आंदोलन स्थळी भेट दिली. यांच्या समवेत आंदोलन कार्यकर्त्यांनी एकाच घरातील, गावातील, शिवारातील काही शेतकऱ्यांच्या क्लेम मंजूर केला. तर त्याच गावातील शिवारातील काही शेतकरी वंचित कसे राहता हे अन्यायकारक असून या वंचित शेतकऱ्यांना न्याय मिळालाच पाहिजे अशी आग्रही मागणी लावून धरली व याबाबत कृषी अधिकारी यांनी रद्द केलेले अर्ज तपासणी करून वंचित शेतकऱ्यांना विमा मंजूर करावा असे सुचित केले.

तसेच कन्नड तालुक्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी रीतसर नुकसानीची तक्रार केली होती. त्यामुळे कांदा उत्पादक नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे वेळेत नुकसानीची तक्रार केल्यामुळे या शेतकऱ्यांचे प्रकरणे मंजूर करून संबंधितांना विमा क्लेम द्यावा असे लेखी स्वरूपात विमा कंपनीला सुचित केले.

याबाबत चोला कंपनीचे मॅनेजर यांनी 10 जुलैपर्यंत शेतकऱ्यांना न्याय देण्यात येईल असे सांगितले कृषी विभाग, चोला कंपनी यांनी लेखी पत्र दिल्यामुळे आंदोलनकर्त्यांनी सदरील आंदोलन तात्पुरते स्थगित केले आहे. मात्र कंपनीने दिलेला शब्द न पाळल्यास पुन्हा तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा आंदोलन कर्त्यांनी दिला तालुक्यातील ज्या शेतकऱ्यांनी नुकसानीची तक्रार 2022/23 व 2023/24 या



वर्षी दिली असेल तर अशा सर्व शेतकऱ्यांनी याची प्रत पोहाच करावी असे आवाहन करण्यात आले. याप्रसंगी डॉ आण्णासाहेब शिंदे, अशोकराव दापके, डॉ सदाशिव पाटील, गिताराम पवार, ज्ञानेश्वर वेताळ, लक्ष्मीकांत खरे, अविनाश खरे , अशोक कुमावत, सुदाम राठोड, शिवाजी थेटे, शिवाजी दळवी, गणेश शिंदे, विकास राठोड, दिगंबर जाधव, देविदास चव्हाण, भानुदास तुपे, प्रकाश आबा अहेर, जनार्दन राठोड, राजू राठोड, अप्पासाहेब काळे व शेतकरी उपस्थित होते.

## गिरडा घाटात भरपावसात रेस्क्यू: दोन बिबटे केले पिंजऱ्यात जेरबंद !

### 'अंबाबरवा'मध्ये सोडणार ! आरएफओ अभिजित ठाकरे यांची मोठी कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील पिंपळवाडी येथूनच हाकेच्या अंतरावर असलेल्या गिल्डा घाट दोन जिल्ह्यांच्या सिमेवर आहे बुलढाणा जंगलाला लागून असलेल्या गिरडा परिसरात मागील काही महिन्यांपासून मोठ्या प्रमाणात बिबट्यांनी धुमाकूळ घालत पाळीव जनावरांना ठार केले आहे. त्यामुळे वाहनधारक व गावकऱ्यांमध्ये दहशतीचे वातावरण होते. मागणीनुसार वनविभागाने गावाजवळ पिंजरे लावले असता यात २७ जूनच्या रात्री दोन बिबटे अडकले आहेत. पिंजऱ्यात कैद या दोन्ही बिबट्यांना अंबाबरवा अभयारण्यात सोडण्यात येणार असल्याची माहिती बुलढाणा आरएफओ अभिजित ठाकरे यांनी विभागीय संपादक गोकुळसिंग राजपूत यांच्याशी बोलताना दिली आहे.

हल्ल्याच्या घटनेनंतर बुलढाणा वनविभागाने गिरडा गावालगतच एक पिंजरा लावला होता. काल रात्री एक मादी बिबट्या या पिंजऱ्यात अडकली व त्याच्या अवतीभोवती दोन पिल्ले फिरत असल्याचे लक्षात आल्यानंतर वनविभागाने तत्काळ दुसरा पिंजरा लावला. त्यात ही एक बिबट्याचा बछडा अडकला. या ठिकाणी अजून बिबटे असल्याने आता तिसरा पिंजरासुद्धा लावण्यात आला आहे. एकाच वेळी २ पिंजऱ्यांत दोन बिबटे अडकल्याने गिरडा गावकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे.बिबट्याने गुरांवर केला होता हल्ला, शेतकरी भयभीत झाले होते या अनुषंगाने बुलडाणा तालुक्यातील गिरडा हे गाव अजिंठा पर्वतरांगेवर वसलेले आहे.

गावाला लागूनच घनदाट जंगल असल्यामुळे या ठिकाणी



मोठ्या प्रमाणात हिंस्त्र प्राण्यांचा अधिवास आहे. अनेक वेळा बिबट्या, अस्वल, तडस सारखे वन्यप्राणी गावातदेखील दाखल होतात. मागील काही महिन्यांपासून परिसरात बिबट्या सतत दिसत असल्याने शेतकऱ्यांत भीतीचे वातावरण होते. अशात एका शेतकऱ्याची गीर जातीच्या गायीला बिबट्यांनी ठार केले होते.आरएफओ अभिजित ठाकरे यांच्या नेतृत्वात वनपाल स्वप्नील वानखेडे, वनरक्षक प्रदीप मुंडे, बाळासाहेब घुले, रेस्क्यू टीमचे संदीप मडावी, अमोल चौहान, दीपक गायकवाड, प्रवीण प्रोनने तनमत्तर टीपक्त मोनने रेतन तायडे यांनी राजू गायकवाड इतर गावकऱ्यांच्या मदतीने काल रात्री भरपावसात दोन्ही बिबट्यांना फिजिकल रेस्क्यू करून बुलढाणा येथील उपवन संरक्षण कार्यालयात आणले. आता अंबाबरवा अभयारण्यात सोडणार आहे.

## जास्त पैशाचा मोह व आलेली लिंक ठरली लाखो रुपयास चटका देणारी

### शिर्डी येथील घटना

आधुनिक केसरी न्यूज



**शिर्डी :** शेअर बाजारात कायम गुंतवणुकीचा छंद जास्त नफ्याचा मोह एका कुंटबाला लाखोचा चटका देणारा ठरला आहे. वेळोवेळी पोलीस प्रशासन व सायबर सुरक्षा आव्हान करत असताना देखील केलेले दुर्लक्ष याचा फायदा काही भामटे घेत आहे मोबाईल वर आलेल्या जी एफ एस एल या नावाच्या अशोक नगर चेन्नई येथील स्टेट बँक ऑफ इंडिया शाखेत बनावट खात्याचा विश्वास दाखवून वेळोवेळी लिक आली मेसेज आले केलेल्या गुंतवणूक वर २०टक्के नफा होईल असे आश्वासन दिले त्यामुळे वेळोवेळी ४लाख ९५हजाराचा भरणा केला आमच्या खात्यात नफा देखील २०लाखाचा दिसत होता पण पैसे निघत नसल्याने शिर्डी येथील राष्ट्रीयकृत बॅन्केत जेथे माझे खाते आहे तेथे चौकशी केली असता ज्या ठिकाणी पैसे पाठवले आहे त्या बॅन्केत जी लिक आली आहे त्याचे खाते नाही तुमचे तीन लाख रुपये होल्डवर ठेवल्याचे सागितले आमची फसवणूक झाली आहे त्यामुळे संदर नावाच्या आलेल्या लिक विरोधात शिर्डी पोलीस ठाण्यात पल्लवी विजया ग्वालाणी राहणार वाघ वस्ती शिर्डी यांच्या फिर्यादी वरुन भादवी ४२७,४२०,अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून आधिक तपास शिर्डी पोलीस स्टेशन मधील पोलीस निरीक्षक रामकृष्ण कुंभार हे करीत आहे.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in



## 'वाकी' पायी दिंडीचे ग्रामस्थांकडून स्वागत

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी येथे वाकी देवास्थानाकडे कुच करणारी पायी दिंडीचा ग्रामस्थांकडून दि.०१ जंगी स्वागत करण्यात आला. दरवर्षी परंपरागत पायी दिंडीचा प्रस्थान बाजार सावंगी येथून होते मुक्काम करुन दिंडी वाकी, ता.कन्नड देवास्थानाकडे रवाना होते. सरपंच अप्पाराव नलावडे यांनी दिंडीचे स्वागत करुन सत्कार केला. जेष्ठ समाजसेवक पुंजाजी अण्णा नलावडे, जेष्ठ ग्रामपंचायत सदस्य पोपट काटकर, मोठ्या संख्येने कार्यकर्ते पदाधिकारी नागरिक उपस्थित होते. पायी दिंडी ने येथे भजन कीर्तन गिते सादर करून गावकऱ्यांची मने जिंकली वाद्यावर अनेक भाविक भक्तांनी ठेका धरला तद्नंतर पायी दिंडी वाकी कडे रवाना झाली.

# शेतकऱ्यांचा सन्मान करुन अनोखा कृषी दिन साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** हरीत क्रांतीचे प्रणेते माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक साहेब यांच्या जयंती निमित्त एक जुलै हा दिवस संपूर्ण महाराष्ट्रात कृषी दिवस म्हणुन साजरा केला जातो. यातच पंचायत समिती खुलताबाद व तालुका कृषी अधिकारी खुलताबाद यांच्या संयुक्त विद्यमाने शेतकऱ्यांचा सन्मान करणारा एक आगळा वेगळा कृषी दिन साजरा केला असून या कार्यक्रमाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते. या कार्यक्रमात शासनाने पुरस्कार देऊन गौरविण्यात आलेल्या शेतकऱ्यांबरोबरच पीक स्पर्धेत सहभागी होऊन शेतीत उत्कृष्ट कार्य केले आहे, अश्या शेतकऱ्यांचा सन्मान करण्यात आला.
तालुका कृषी अधिकारी ज्ञानेश्वर तारगे यांनी प्रास्ताविक भाषणात आगळावेगळा कार्यक्रमात शेतकऱ्यांचे मनोबल उचांवण्यासाठी, प्रेरणा देण्यासाठी जगाचा पोशिंदा भुमी पुत्रांचा आनंद व्दिगुणीत करण्यासाठी आजच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याचे सांगितले.
तालुका कृषी अधिकारी ज्ञानेश्वर तारगे, गटविकास अधिकारी प्रकाश नाईक, सहाय्यक गटविकास अधिकारी गोरक्षनाथ पवार, शेतकरी संताराम खोसरे, गटशिक्षणाधिकारी विलास केवट, कृषी अधिकारी हणमंत बोयनर, विस्तार अधिकारी एच बी कहाटे, मंगेश शिंदे, शशिकांत सासणे, मयूर पाटील, प्रतिभा कांबळे, मंडळ अधिकारी काकासाहेब इंगळे उपस्थित होते. हरित-धवल क्रांतीचे प्रणेते, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त खुलताबाद पंचायत समितीचे गटविकास अधिकारी प्रकाश नाईक व तालुका कृषी अधिकारी ज्ञानेश्वर तारगे, कृषी अधिकारी हणमंत बोयनर यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या वेळी वसंतराव नाईक शेतीमित्र पुरस्कार विजेते पत्रकार विजय चौधरी, पीक स्पर्धेतील शेतकरी राजू हारदे,रमेश माळी, विजय श्रीखंडे, हिंमत अधाने, भाऊसाहेब चव्हाण, बबन गोरे, मिठू चव्हाण, जिजाबाई शिंदे या शेतकऱ्यांनी गहू मका सोयाबीन आणि इतर विविध पीक स्पर्धेत सहभागी होऊन भरघोस उत्पादन घेतल्याबद्दल सत्कार करण्यात आला. सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी काम करीत असलेल्या माऊली शेतकरी महिला गट मावसाळा तसेच गल्ले बोरगाव येथील प्रगती शेतकरी गटातील शेतकरी महिलांचा सत्कार करण्यात आला. बाजारसावंगी येथील उषा वसंतराव सोनवणे यांना बाळासाहेब ठाकरे प्रेरित आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना जिल्हा परिषद उपकर योजनेअंतर्गत पाच हजार रुपये किंमतीचे बियाणे खरेदीसाठी अनुदान देण्यात आले यांनी मनोगत व्यक्त केले. तालुका कृषी अधिकारी ज्ञानेश्वर तारगे यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन प्रदीप पाठक यांनी केले. कृषी अधिकारी हणमंत बोयनर यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कृषी पर्यवेक्षक संजय ढवले, कृषी अधिकारी मयूर पाटील, प्रतिभा कांबळे, मंगेश शिंदे, शशिकांत सासणे, प्रदीप पाठक, पल्लवी गायकवाड, विजय सोनवणे यांनी परिश्रम घेतले.






# 'डॉक्टर्स डे'निमित्त मुखेड येथील डॉक्टरांवर शुभेच्छांचा वर्षाव; कृतज्ञता आणि आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**मुखेड :** डॉक्टर्स डे निमित्त दि. १ जुलै, 2024 रोजी वैद्यकीय संस्था आणि IMA मुखेड चे पदाधिकारी डॉ. अशोक कौरवार डॉ. रामराव श्रीरामे, डॉ. कैलास पाटील, डॉ. श्रीहरी बुडगेमवार आणि इतर अनेक डॉक्टरांच्या पुढाकारातून सामाजिक वनीकरण विभाग, मुखेडच्या सहकार्याने 200 विविध झाडांच्या रोपट्यांचे रोपण करुन या सर्व रोपट्यांचे संगोपन करण्याची जबाबदारीही घेण्यात आली. वृक्षारोपण ही आज काळाची गरज बनली आहे. निसर्ग वाचल्याशिवाय माणसाचे भविष्य वाचणार नाही. धरती माँ की एक पुकार, बच्चे कम हो पेड हजार निसर्गाच्या विरुद्ध गेले की विसर्ग हा ठरलेलाच.. आता सर्वांनी जागे होऊन किमान एक तरी झाड लावावे. नववधूचा गृहप्रवेश, मुलां-मुलींच्या जन्माचे स्वागत, लग्नाचे वाढदिवस, स्वतःचे वाढदिवस, सण, उत्सव, स्मृतीप्रित्यर्थ आणि अनेक समाजकार्यांच्या माध्यमातून वृक्षारोपण करता येऊ शकते. आपली शेती, शाळा महाविद्यालये, शासकीय कार्यालये, स्मशानभूमी आणि जेथे जमेल तेथे आपण वृक्षारोपण करू शकतो. वृक्ष लावणे आणि त्याचे संगोपन करणे हे लहान मुलांसारखेच आहे. भारतातील लोकसंख्येचा विचार करता दरडोई झाडांचे प्रमाण अत्यल्प आहे. किमान एक कुटुंब एक वृक्ष हा विचार मनात ठेवला आणि राबविला तरी लाखो, करोडो झाडे निर्माण होतील. 'वृक्षवल्ली आम्हा सोयरी', हे आपण नेहमीच म्हणतो. FOREST म्हणजे मानवी आणि इतर जीव-जीवनांचा मूलमंत्र होय. वृक्षारोपण आणि जल संवर्धन हे संस्कार आणि जनचळवळी व्हाव्यात आणि प्रत्येकाने त्यात योगदान द्यावे. महाराष्ट्रात अनेकजण या चळवळी निरपेक्ष भावनेने चालवतात, त्या सर्वांचे अभिनंदन. शेतकरी, लोकप्रतिनिधी, डॉक्टर्स, पत्रकार, व्यापारी, साधूसंत, सामाजिक संस्था, शाळा, महाविद्यालये, शासकीय कार्यालये, सामाजिक कार्यकर्ते अशा अनेक घटकांना मी आव्हान करतो की, चला जागे होऊ या आणि वृक्षारोपण करूया.

# दौलताबादमध्ये दिंडीचे ग्रामस्थांकडून स्वागत

आधुनिक केसरी न्यूज

**प्रकाश लकडे**
**दौलताबाद :** वाकीची दिंडी आज ऐतिहासिक (देवगिरी) दौलताबादमध्ये दरवर्षीप्रमाणे याही वर्षी चहा नाश्त्यासाठी वाकी येथून मार्गस्थ झाली. हरिनामाच्या गजरामध्ये पंढरपुराकडे पोहोचणार आहे. मंगळवारी दौलताबादमध्ये वारकरी म्हणून सुरेश आप्पा चुनुके, अशोक आप्पा चुनुके, दिगंबर चुनुके, दत्ता चुनुके, अजय चुनुके, सत्यम चुनुके, वेदान आनंद, रामेश्वर भगत उपस्थित होते.






# लळींग गावात स्मशानभूमीची दुर्दशा; भावनेशी खेळ, भर रस्त्यावर जाळले प्रेत

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** जिल्ह्यातील लळींग गावात गेल्या 75 वर्षापासून स्मशानभूमीची अवस्था खूप बिकट आहे त्या ठिकाणी प्रेत जाळण्यासाठी अनेक वर्षापासून सोयीनुसार स्मशानभूमी नाही त्या जागेवर मंजूर झालेल्या कामात मोठा भ्रष्टाचार झाल्याचा आरोप गावकऱ्यांनी केला आहे त्या ठिकाणी अर्धवट बांधकाम करून स्थानिक लोकांच्या भावनेशी खेळ केला आहे अनेक दिवसापासून भर रस्त्यावर प्रेत जाळले जात आहे काही संतप्त नागरिकांनी त्या ठिकाणी प्रतिक्रिया दिल्या आहेत त्या ठिकाणी अनेक राजकारण्यांना त्यांनी व्यथा मांडली आहे परंतु कोणीच या ठिकाणी दखल घ्यायला तयार नाही असा आरोप करण्यात आला आहे. अर्धवट झालेल्या कामासंदर्भात काही गावाच्या नागरिकांनी आवाज उठवण्याचा प्रयत्न केला तर त्यांना धमकावण्याचा प्रयत्न केला जातो असा आरोप करण्यात आला आहे स्थानिक नागरिकांची मागणी आहे की प्रशासनाने त्वरित याकडे लक्ष देऊन लळींग येथील स्मशानभूमीचे काम तात्काळ सुरू करावे, असे या ठिकाणी सांगितले आहे.

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर